





संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. २१.१०.२०२४ | अंक नं. १९६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020






पीव्हीसी कारपेट, उडन स्ट्रीप-फ्लोरिंग, वॉलपेपर, वेलवेट कारपेट, गालिचा, रोमन-रोलर- व्हर्टिकल्स - क्लॉथ कर्टन्स व कर्टन्स फिटिंग, सोफा व सोफा मटेरियल,मॅट, मॅटिंग, रबर मॅट, सॉफ्ट - हार्ड मॅट, ग्रीन ग्रास, हिरवी जाळी, मच्छर जाळी, प्लास्टिक मॅट-चटई, कुशन्स-पिलोज, बेडशीट, ब्लँकेट, सोफा कव्हर्स, योगा मॅट, क्लिनिंग मटेरियल
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

ISO 9001-2008
भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था मर्या.केडगाव

| मुदत ठेव | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवसाकरिता | ८ % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ९ % |
| ९१ दिवस ते ३६५ दिवस | १० % |
| १२ महिने ते १७ महिने | १०.५० % |
| १८ महिन्याच्या पुढे | ११ % |
| मसिक ठेव (संचित मुदत ठेव) | ८% |
| दैनंदिन ठेव (बिंदूसागर ठेव) | २.५०% |
| व्यक्तीगत सेव्हिंग्ज ठेव (द.सा.द.शे) | ५% |

आपल्या विश्वासाची भैरवनाथ पतसंस्था केडगाव, नगरकरांच्या सेवेत घेऊन येत आहे
सुवर्ण कर्ज व ठेव योजना
सर्व ठेवी ज्येष्ठ नागरिक ०.५०% (अर्धा टक्का व्याज) जादा

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road. Ahmednagar. Mob 9422224990

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505


# दागिने चोरण्यासाठी नातवाने केला आजीचा गळा दाबून खून; आरोपी अटकेत


मयत गोदाबाई जाधव

नगर – ९० वर्षीय आजीच्या गळ्यातील दागिने काढून घेण्यासाठी नातवाने आजीचा गळा दाबून खुन केल्याची घटना नगर तालुक्यातील अकोळनेर गावच्या शिवारात उघडकीस आली. गोदाबाई लक्ष्मण जाधव (रा. माळवाडी, अकोळनेर, ता. नगर) असे मयत वृद्ध महिलेचे नाव आहे.

या प्रकरणी आरोपी निलेश बाळासाहेब जाधव (वय २५) याला नगर तालुका पोलिसांनी पकडले असून त्याने ७० हजार रुपये किमतीचे दागिने चोरण्यासाठी खुन केल्याची कबुली दिली असल्याची माहिती नगर तालुका पोलिस ठाण्याचे सपोनि. प्रल्हाद गिते यांनी दिली. याबाबत मयताचा मुलगा पोपट लक्ष्मण जाधव यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना माळवाडी येथे १९ ऑक्टोबरला सकाळी ८.१५ ते सायंकाळी घडली असून, ती २० ऑक्टोबरला सकाळी ८.३० च्या सुमारास उघडकीस आली आहे.

## मृतदेह लपवून आजी हरविल्याची सोशल मिडीयावर टाकली पोस्ट

आरोपी निलेश जाधव याने शनिवारी सकाळी केव्हातरी आजीचा गळा दाबून खून केला. त्यानंतर तिच्या कानातील व गळ्यातील सुमारे १ तोळा वजनाचे सोन्याचे दागिने काढून घेतले. आजीचा मृतदेह दिवाणमध्ये लपवून ठेवला. सायंकाळी सोशल मिडीयावर पोस्ट टाकली की, 'आजी हरवली आहे, कोणाला दिसल्यास संपर्क करावा' व पोस्टमध्ये फोटोखाली संपर्कासाठी त्याचा तसेच कुटुंबातील आणखी दोघांचे मोबाईल नंबर दिले. त्याने रचलेल्या बनावामुळे जाधव कुटुंबातील सदस्यांनी आजीचा परिसरात शोध घेतला, मात्र ती सापडली नाही.

रविवारी सकाळी फिर्यादी पोपट जाधव यांना दिवाणमधून मुंग्या निघत असल्याचे दिसले. त्यांनी मुंग्या कोठून निघतात, हे पाहण्यासाठी दिवाणवरील प्लायवूडचे झाकण उघडले असता त्यांना त्यात गोदाबाई यांचा मृतदेह दिसून आला. त्यांनी कुटुंबातील सदस्यांना माहिती देत पोलिसांना फोन केला. माहिती मिळताच नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक संपतराव भोसले, सपोनि. प्रल्हाद गिते, उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे आदींनी पथकासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. जाधव कुटुंबियांकडे विचारपूस केल्यावर त्यांनी आरोपी निलेश जाधव याच्यावर संशय व्यक्त केला. पोलिसांनी हालचाली करत फरार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीला पकडले. त्याच्याकडे कसून चौकशी केल्यावर त्याने दागिन्यांसाठी आजीचा गळा दाबून खून केल्याची कबुली दिली. आरोपी निलेश जाधव याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करत त्यास अटक केली. पुढील तपास स.पो.नि. प्रल्हाद गिते हे करत आहेत.


रात्रीच्या अंधारात वाहनचालकाला अंदाज न आल्याने दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातातील नुकसानग्रस्त कार. (छाया – बबलू शेख)

# महामार्गावर लाईट नसल्याने दुभाजकाला धडकून कार पलटी

**लाईट, रिफ्लेक्टर, सूचना फलकासह सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची मागणी**

नगर – अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गावर महापालिका हद्दीतील दिपाली टॉकीजपासून ते वसंत टेकडीपर्यंतच्या रस्त्यावर लाईट, रिफ्लेक्टर, सूचना फलक अशा सुरक्षेच्या कोणत्याही उपाययोजना केलेल्या नसल्याने वाहनचालकांना रात्रीच्यावेळी रस्ता दुभाजकाचा अंदाज येत नाही. त्यामुळे दुभाजकाला धडकून अपघाताच्या घटना वारंवार घडत आहेत.

या महामार्गावर रविवारी (दि. २०) रात्री अंधारात दुभाजकाचा अंदाज न आल्याने एक कार दुभाजकाला धडकून पलटी झाली. त्यात वाहनचालकासह काहीजण जखमी झाले. तसेच कारचेही मोठे नुकसान झाले. या रस्त्यावर सुरक्षेच्या कोणत्याच उपाययोजना नसल्याने रात्री अपरात्री प्रवास करणे प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहे. महापालिका आणि बांधकाम विभागाने महामार्गावरील लाईट, रिफ्लेक्टर तसेच सूचना फलक लावून सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# शासकीय पत्रांवरील स्वाक्षरी खाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव अनिवार्य

**१६ जून २००५ च्या परिपत्रकाच्या अंमलबजावणीबाबत आदेश निर्गमित**

नगर – शासकीय कार्यालयातून पत्र निर्गमित करतेवेळी त्या पत्रांवर संबंधित अधिकारी स्वाक्षरी करतात व त्याखाली नाव लिहितात किंवा त्याच्या वतीने ज्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी स्वाक्षरी करतात परंतु करिता असा उल्लेख करून स्वाक्षरी खाली स्वतःचे नाव लिहीत नाही परिणामी त्या अधिकाऱ्याची ओळख पटत नाही. काही प्रकरणात अधिकारी किंवा त्याच्या वतीने करिता म्हणून स्वाक्षरी करणारा अधिकारी बदली झाल्यास त्याची माहिती घेण्यासाठी फार कसरत करावी लागते असे शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

मंत्रालयीन विभागातून निर्गमित होणाऱ्या प्रत्येक पत्रांवर स्वाक्षरी खाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली पदनाम लिहिण्याची जी पद्धत आहे त्याप्रमाणे राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामधून पत्र निर्गमित करतेवेळी प्रत्येक पत्रावर स्वाक्षरी खाली कंसामध्ये स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व त्याखाली त्याचे पदनाम लिहिण्याची सूचना महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार दिल्यानंतर १६ जून २००५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने परीपत्रक निर्गमित केले. १६ जून २००५ रोजी निर्गमित झालेल्या पत्राची आजही अहमदनगर मधील अनेक शासकीय कार्यालयांकडून दखल घेण्यात आलेली दिसत नाही. आजही अनेक शासकीय कार्यालयातून स्वाक्षरी खाली कंसामध्ये नांव नसलेले पत्र निर्गमित केले जातात हे निदर्शनास आल्यानंतर, परीपत्रकाची अहमदनगरमधील शासकीय कार्यालयाकडून दखल घेतली जावी म्हणून जिल्हाधिकारी व आयुक्त महानगरपालिका यांना मेल द्वारे आवश्यक ती सर्व माहिती (कागदपत्रे) देऊन याविषयी परीपत्रक काढण्याची विनंती केली. याबाबत तत्काळ दखल घेऊन मनपा कार्यालयातून २३.०९.२०२४ रोजी व अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल शाखेकडून १०.१०.२०२४ रोजी परीपत्रक निर्गमित करण्यात आले असल्याची माहिती शेख शहाजान फकिर यांनी दिली आहे.


आदरांजली



अशोकभाऊ फिरोदिया
जन्म दि. २ ऑक्टोंबर १९४४ । स्व. दि. २२ ऑक्टोंबर २०००
आपल्या विचाराने, कार्याने, कर्तृत्वाने
शिक्षणक्षेत्रात भरीव योगदान देणारे आदर्श व्यक्तिमत्व...
२४ व्या स्मृतीदिनी विनम्र अभिवादन !
AES
सर्व विश्वस्त, सल्लागार मंडळ, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
अहमदनगर एज्युकेशन सोसायटी
अहमदनगर.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## ज्ञानेश्वरांचा बुद्धीयोग

वाचनीय मननीय – प्रेरणादायी अक्षर धन – संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

संतश्रेष्ठ ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत बुद्धीयोगाचे सविस्तर विवेचन केले आहे. अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना, 'बुद्धीयोग म्हणजे काय?' असा प्रश्न विचारला होता. भगवानांनी माऊली ज्ञानोबांच्या शब्दातून या प्रश्नाचे सहजसुंदर व समृद्ध उत्तर, विवेचन दिले आहे.

ज्याला बुद्धीयोग मार्गाची हातोटी सापडली आहे त्याला कर्म बाधत नाहीत. ज्याचा बुद्धीवर विश्वास असून सद्क्रियेची साथ आहे तिथे बुद्धीयोग जन्मतो.

निष्काम कर्मयोगाचे दुसरे नाव म्हणजे बुद्धीयोग. मन, बुद्धी, अभ्यास यातून जे काही कार्य होते ते समाजाला उद्बोधक असते. अंगात चिलखत घातले की शस्त्रांची भिती वाटत नाही. त्याप्रमाणे बुद्धीयोगाचे आचरण केल्याने इहलोकाचे सुख नाहीसे न होता मोक्ष मिळवता येतो म्हणून बुद्धीयोग आचरणे आवश्यक. ज्ञानदेवांच्या मते विहीत कर्माचे आचरण हे बुद्धीयोगाचे मूळ सुत्र आहे. कर्म महत्त्वाचे आहे.

एका उत्कृष्ट दृष्टांताने माऊली सांगतात, ''दिव्याची ज्योत लहान असते पण तिचे तेज मोठ्या प्रमणात पसरते. त्याप्रमाणे सद्बुद्धी छोटी असली तरी तिच्यात परमेश्वरापर्यंत पोहोचवण्याइतका आत्मप्रकाश असतो म्हणून तिला लहान म्हणू नये.''

शाश्वत सुखाचा शोध घेण्यासाठी बुद्‌ीयोग जाणणे, अनुभवणे आवश्यक ठरते.

(डॉ. यशवंत पाठक)



# अहिल्यानगरच्या जनतेला नेतृत्वबदल हवा तो बदल २३ नोव्हेंबर रोजी घडणारच आहे

### खोट्या विकास कामांना आता नगरची जनता बळी पडणार नाही : वसंत लोढा



नगर – माझ्यासमोर कोणाचेही आव्हान नाही. मागील पाच वर्षापासून काम करतोय व विकास कामाच्या माध्यमातून नगरकरांचा विश्वास माझ्यावर आहे. या आ.संग्राम जगताप यांच्या वक्तव्यावर वसंत लोढा यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गेल्या दहा वर्षापासून अहिल्यानगरात आपण काय विकास कामे केली आहेत. ती सर्व नगरकरांना माहित आहेत. दीडशे कोटी निधी आणून आपण दहा वर्षाचा बॅकलॉग भरून काढला असे सांगत आहात. तर दहा वर्ष नगरकर विकासाच्या प्रतीक्षेत व नगर आजही खड्ड्यातच आहे. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून एकाच वेळी सर्व रस्त्याची कामे सुरू झाल्याने नगरकरांना व व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात सणासुदीच्या काळात वाहतुकीचा सामना करावा लागत आहे. आपण नगर मधील रस्ते टप्प्याटप्प्याने जर केले असते तर नगरकरांना वाहतुकीचा त्रास झाला नसता. बाजारपेठेतील रस्त्यांची खोदकामे झाल्याने बाजारपेठेत येणाऱ्या ग्राहकांची संख्या देखील कमी झाली आहे. यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. तसेच नगर मनमाड रोडवर धुळीचे साम्राज्य पसरल्याने मोठ्या प्रमाणात श्वसनाचे आजार होत आहेत. तांत्रिकदृष्ट्या पावसाळ्यात रस्त्याची कामे करू नयेत. असे असताना देखील भर पावसाळ्यात रस्त्याच्या कामांचे उद्‌घाटन होऊन सुरू झाली आहेत. यामुळे रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीचे होणार नाहीत. शहराच्या रस्त्याची वाट लागली. खड्ड्यांमुळे चांगला रस्ताच दिसत नाही. रस्ते म्हणजे विकास नाही. शहरातील जनतेला हवंय उच्चशिक्षण, रोजगार, औद्योगिक प्रगती तसेच नगर शहर पर्यटन व्हावे. अहिल्यानगरच्या मागून संभाजीनगर, पुणे, नाशिक या शहरांचा झपाट्याने विकास झाला आहे. शहरात बेरोजगारीच्या समस्या तसेच एमआयडीसीची दुरावस्था यामुळे शहराची बकाल अवस्था झाली आहे.

तसेच नगरकरांच्या जिव्हाळ्याच्या पाण्याचा प्रश्न आज देखील सुटलेला नाही. फेज टू पाण्याच्या व अमृत योजनेची काय वाट लागली आहे. हे जनता पाहत आहे. अतिक्रमणात शहर पूर्णपणे बुडाले आहे. भाजी मार्केट ने शहरातील व उपनगरात रस्ते व्यापले आहे. फक्त करोडोंची जाहिरात करून नगरकरांची दिशाभूल चालू आहे. झालेल्या विकासकामांच्या दर्जाचा विचार करता वर्ष सहा महिन्यात त्या रस्त्याची वाट लागुन शहर पुन्हा खड्डेमय होईल. शहरातील नाट्यगृह दहा वर्षापासून अर्धवट अवस्थेत आहे. सर्व गार्डनची अवस्था सार्वजनिक न राहता बगलबच्चांना देऊन खाजगीकरण केले. व वाट लावली आहे. आणि आता निवडणूक आल्यावर विकास कामांची जाग आली आहे. जर खरंच जनतेचा आपल्यावर विश्वास होता. तर श्रीगणेश उत्सवात गणेश मंडळ व आरस न दिसता आपल्या छबीने सर्व नगर झाकल्या सारखे दिसत होते. वेगवेगळ्या जयंतीच्या मिरवणुकांतून डीजेच्या माध्यमातून शहरात ध्वनी प्रदूषणाचा मोठा गोंगाट करुन आपण लाखो रुपये खर्च करून तरुणाईला चुकीच्या मार्गाने नेले. शहरात फक्त फ्लेक्स बोर्ड च्या माध्यमातून ओंगळवाणे प्रदर्शन आपण केले.

दहा वर्षात महिलांना कोणतीच भेट दिली नाही. वेगवेगळ्या माध्यमातून करोडो रुपये खर्च करून भेट म्हणून साड्या, पैठणी व इतर साहित्य व भोजनावळी आत्ताच का? गेल्या दोन महिन्यांपासून शहरातील सर्व भागात फक्त बोर्डच्या माध्यमातून जे प्रदर्शन सुरू होते. त्यामुळे जे प्रदूषण झाले होते, ते आचारसंहिता असल्यामुळे शहर प्रदूषणमुक्त झाले आहे. यामुळे नगरकरांना हायसे वाटत असून शहरातील वातावरण मोकळे –मोकळे झाल्याचे दिसत आहे. दीडशे कोटींच्या कामात रस्ता काँक्रीटीकरणाची कामे चालू आहेत. त्या कामात काँक्रिटीकरणात (स्टील) गज वापरले असते. पावसाळ्याच्या आधी आपण रस्त्याची कामे सुरू केली असती. तर दहा पंधरा वर्षे रस्ता मजबुतीने राहिला असता. परंतु शहरातील रस्ते एक ते दोन वर्षात वाट लागलेली दिसतील. या सर्व विकास कामाच्या पैशातून हा सर्व करोडो रुपयांचा खर्च करून मतदारांना अशा वेगवेगळ्या माध्यमातून आकर्षित करायचा मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहे.

नगरकर आपल्या बरोबर आहेत. तर मग हा एवढा मोठा खर्च व खटाटोप का सुरू आहे. आपण एवढा खर्च करीत आहात जर हा खर्च खरच विकास कामाला लावला असता. तर या पैशातून शहरातील १० मुख्य रस्ते झाले असते. अहिल्यानगरची जनता फारच सुज्ञ आहे. त्यांना सर्व समजत असून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून ही वाटचाल सुरू आहे. म्हणून शहरात बदलाचे वातावरण असून दहा वर्षाच्या इतिहासाला आता तिलांजली देणे गरजेचे आहे. अहिल्यानगर शहराच्या जनतेला आता नेतृत्व बदल हवा आहे. तो बदल २३ नोव्हेंबर रोजी घडणारच आहे. खोटे विकास कामांना आता नगरची जनता बळी पडणार नाही, असे भाजपा प्रदेश सदस्य वसंत लोढा यांनी जाहीर आवाहन केले आहे.

# नव्याने झालेले रस्ते झाले खराब; मुख्यमंत्र्यांकडे तक्रार


नितीन भुतारे

नगर – शहरातील नवीन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते माळीवाडा रोडचे काम १ महिना झाले पूर्ण होताना दिसत असताना एक बाजूचा रोड पूर्णपणे खराब झाला आहे. सिमेंट काँक्रिट करण्यात आलेला रस्ता त्याला खड्डे पडून सिमेंट काँक्रिट उखडले आहे. त्यामुळे शासनाने दिलेले कोट्यावधी रुपये पाण्यात गेले आहे. हा भ्रष्टाचार शहर अभियंता, आयुक्त, लोकप्रतिनिधी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने होताना दिसतो आहे. त्यामुळे करोडो रुपयांचा निधी वाया गेला. हे या विकास कामातून सिध्द होते. फक्त ठेकेदाराचे खिसे भरण्यासाठी शासन निधी देत आहे आणि त्यांना आयुक्त पाठीशी घालत आहे, असा आरोप नितीन भुतारे यांनी केला आहे.

यापूर्वी नगर शहरातील आनंदधाम ते स्वस्तिक चौक हा रस्ता खराब झाला असून संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी भुतारे यांनी केली आहे. या रोडला सुध्दा तडे गेले आहेत. याबाबत निवेदन देऊनही आयुक्त यांनी त्या ठेकेदारावर कुठलीही कारवाई केली नाही. त्यामुळे आयुक्तांना निवेदन देऊन उपयोग नाही. आयुक्त व शहर अभियंता हेच भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालून निविदा प्रक्रिया संगनमताने राबवून भ्रष्टाचार करतात मुख्यमंत्री यांनी या प्रकरणात लक्ष घालून संबंधित ठेकेदाराकडून खराब झालेले नवीन रस्ते पुन्हा नव्याने तयार करून घ्यावेत. तोपर्यंत या ठेकेदार कंपनीला बिले अदा करू नये अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मेल व्दारे निवेदन पाठवून भुतारे यांनी केली. विभागीय आयुक्तांकडे तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

# निवडणुकीत मतदान करणे प्रत्येकाला बंधनकारक करावे

### १०० टक्के मतदान होण्यासाठी नियम व अटी घालाव्यात : जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

नगर – लोकशाहीच्या माध्यमातून निवडणुकीत मतदान करणे बंधनकारक करावे यासाठी नियम व अटी तयार कराव्यात. त्यातून १०० टक्के मतदान होईल अशी व्यवस्था करावी, अशी मागणी ऋषिकेश गुंडला यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात गुंडला यांनी म्हटले आहे की, निवडणुकीत १०० टक्के मतदान होणे गरजेचे आहे. ज्येष्ठ युवकांसाठी तसेच जे मतदानाला येऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी शासनाने उपाययोजना राबवाव्यात. जे मतदान करणार नाहीत त्यांना शासकीय लाभ घेता येणार नाहीत असे काही कडक नियम घालून द्यावेत. मतदान न केल्यास त्याबाबतचा खुलासा संबंधित मतदाराकडून घेण्यात यावा. आमदार कसा असावा अशी निबंध स्पर्धा शासकीय कार्यालयाने व प्रत्येक शाळेने घ्यावी. आमदाराचे हक्क व कर्तव्य याबाबत सामान्य जनतेपर्यंत जनजागृती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## केडगाव उपनगरात तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

नगर – केडगाव उपनगरातील तरूणाने राहत्या घरात सिलींग फॅनच्या लोखंडी हुकला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. नारायण केशव मोरे (वय ३२) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

नारायण मोरे यांनी शनिवारी (दि.१९) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास त्यांच्या राहत्या घरी सिलिंग फॅनच्या लोखंडी हुकला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. याची माहिती मिळताच त्याच्या नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी सव्वा एक वाजता येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टर कुलकर्णी यांनी तपासणी करून त्यांचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले. अधिक तपास पोलीस अंमलदार भरत गाडीलकर करत आहेत.

## सचिन भांबरकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील नालेगाव भागातील सांगळेगल्लीतील मुळ रहिवासी परंतु सध्या छत्रपती संभाजीनगर येथील एका कंपनीतील कर्मचारी सचिन अच्युत भांबरकर (वय ३७) यांचे २० ऑक्टोबर रोजी पहाटे २ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नगर येथील नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुले, १ भाऊ, १ बहिण असा परिवार आहे. नगरमधील बांधकाम व्यावसायिक संदीप भांबरकर यांचे ते बंधू होत.

## भागिरथी साबळे यांचे अल्पशः आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील भागिरथी सुधाकर साबळे (वय ७२) यांचे अल्पशः आजाराने दुःख निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, दिर, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सुनिल बाबुराव साबळे यांच्या भावजई, उदय बाबासाहेब साबळे यांच्या चुलती, रोहित व विवेक साबळे यांच्या मातोश्री होत.

## शांताबाई लोणकर यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर – येथील शांताबाई निवृत्ती लोणकर (वय ९१) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

नेवासारोड येथील भोलेनाथ इलेक्ट्रिकल्सचे मालक अशोक लोणकर, चितळी डिस्टलरीचे माजी कर्मचारी श्रीकांत लोणकर, श्रीरामपूर न.प.चे सेवानिवृत्त अधिकारी नामदेव लोणकर व पुणे येथील आरसीएम कॉलेजचे सेवानिवृत्त प्राध्यापक भाऊसाहेब लोणकर यांच्या मातोश्री हितेश, महेश, युनियन बँकेचे उपशाखा प्रमुख मुकुंद लोणकर, तुषार व अनिकेत लोणकर यांच्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



महाविद्यालयात मतदार जागृतीवर व्याख्यान देताना प्रमुख वक्ते डॉ. सुधीर वाडेकर.

# मतदानाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवता येतात

### डॉ. सुधीर वाडेकर यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात मतदार जागृतीवर व्याख्यान

नगर – मतदानाच्या माध्यमातून समाजात कसे सकारात्मक बदल घडवता येतात. मतदान प्रक्रियेत पारदर्शकता आणि निष्पक्षता कशी राखली जाते याबाबत कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. सुधीर वाडेकर यांनी माहिती दिली. त्यांनी आपल्या सखोल मार्गदर्शनातून मतदारांच्या हक्क, जबाबदाऱ्या आणि मतदान प्रक्रियेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विशेषतः तरुण मतदारांना उद्देशून मतदानाचा अधिकार आणि कर्तव्ये समजावून सांगितली. याचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.

अहमदनगर महाविद्यालयात 'मतदार जागृती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश लोकशाहीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या मतदान प्रक्रियेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमात उपप्राचार्य नोएल पारगे, रजिस्टर पीटर चक्रनारायण, ई.टी.आय. समन्वयक डॉ. गोकुळदास गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. पोपट सिनारे, डॉ. प्रबंधिका शेलार, डॉ. रविंद्र मते, डॉ.पवनजित छाबडा आणि प्रा. संतोष कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग म्हस्के यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. तर आभार प्रदर्शन यश कच्छवा यांनी केले.

# केडगाव, सावेडी उपनगरात भरदिवसा तीन घरे फोडली

### सोन्या– चांदीच्या दागिन्यांसह रोकड चोरट्यांनी लांबविली

नगर – ऐन सणासुदीच्या काळात चोरट्यांकडून दिवसा घरफोडी करून दागिने, रोकड लंपास केली जात आहे. शनिवारी (दि.१९) तोफखाना हद्दीत एक तर कोतवाली हद्दीत दोन ठिकाणी घरातील दागिने, रोकड लंपास केल्याच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

शुभांगी श्रीपाद दगडे (वय ३१) यांचे बोरूडे मळा, आराधना कॉलनीतील घरातून १५ हजारांची रोकड, सोन्याचे व चांदीचे दागिने असा २२ हजारांचा ऐवज चोरून नेला. चोरी झाली त्यावेळी शुभांगी यांचे घर उघडे होते व त्यांच्या सासू एकट्याच घरात होत्या. चोरट्यांनी उघड्या घरातून आत प्रवेश केला व बेडरूममधून ऐवज चोरून नेला. सदरचा प्रकार शुभांगी यांच्या सासूच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शुभांगीला सदरचा प्रकार सांगितला. त्यांनी तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी शुभांगीच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे.

केडगाव उपनगरातील आदर्श हाईट्स, दूधसागर सोसायटी येथील दोन घरे चोरट्यांनी शनिवारी सकाळी सव्वा दहा ते दुपारी साडेबाराच्या दरम्यान फोडली. एका घरातून १७.५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने व एक हजाराची रोकड तर दुसर्या घरातून तीन हजारांची रोकड असा एकूण ५६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी मनीषा अशोक वामन (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मनीषा यांच्यासह मनोरमा विनय काकडे यांचे घर शनिवारी सकाळी कुलूप लावून बंद केले होते. त्यानंतर चोरट्यांनी कुलूप तोडून घरातील सामानाची उचकापाचक केली व रोकड, दागिने चोरून नेले.

सदरची घटना दुपारी साडेबारा वाजता लक्षात आली. कोतवाली पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी भेट दिली आहे.

अधिक तपास पोलीस करत आहेत.

## दारूची वाहतुक करणारा युवक पकडला

नगर – दुचाकीवरून दारूची वाहतुक करत असलेल्या युवकाला कोतवाली पोलिसांनी पकडले. हेमंत शिवाजी सुरे (वय २३, रा. मल्हार चौक, अहिल्यानगर) असे पकडलेल्या युवकाचे नाव आहे. या प्रकरणी त्याच्याविरूध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार सुरज कदम यांनी फिर्याद दिली आहे. त्याच्या ताब्यातून दारू व दुचाकी असा ४५ हजार ७६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एक युवक दुचाकीवरून देशी व विदेशी दारूची वाहतुक करत असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने सदर युवकाला शनिवारी (दि.१९) सायंकाळी साडेसातच्या सुमारास कायनेटीक चौक ते मल्हार चौक जाणार्या रस्त्यावर पकडले. पंचासमक्ष त्याच्या दुचाकीची झडती घेतली असता त्यात दारू मिळून आली.

अधिक तपास पोलीस अंमलदार सलीम शेख करत आहेत.

# साकळाई योजना कार्यान्वीत होण्यासाठी २७ ऑक्टोबरला चिखली येथे 'सूर्यनामा'

### पुढाऱ्यांनी साकळाईचे राजकारण करुन फक्त भूलथापा दिल्याचा आरोप



नगर – गेली ३० वर्षे राजकीय टोलावाटोलवीत प्रलंबित असलेल्या साकळाई उपसा जलसिंचन योजना कार्यान्वीत होण्याच्या मागणीसाठी चिखली (ता. श्रीगोंदा) येथे पीपल्स हेल्पलाइन व भारतीय जनसंसदेच्या पुढाकाराने रविवारी (दि.२७ ऑक्टोबर) पंचक्रोशीतील शेतकरी व ग्रामस्थ साकळाई योजनेचा सूर्यनामा करणार आहे. सकाळी ९ वाजता या आंदोलनास प्रारंभ होणार असल्याचे नुकतेच साकळाई जलसिंचन योजना कृती समितीच्या झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आले. या आंदोलनात शेतकरी वर्गाने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

साकळाई जलसिंचन योजना कृती समितीचे अध्यक्ष बाबा महाराज झेंडे, नारायण रोडे, डॉ. योगेंद्र खाकाळ, सोमनाथ धाडगे, ज्ञानदेव भोसले, सुरेश काटे, संतोष लगड, तात्या नलगे यांनी पिपल्स हेल्पलाइनचे ॲड. कारभारी गवळी यांच्याबरोबर बैठक घेऊन सदर प्रश्नावर आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या योजनेचे लाभार्थी हिवरेझरे, गुंडेगाव, चिखली, कोरेगाव, मांडवगण, राळेगण म्हसोबा, वडगाव, तांदळी, रुईछत्तीसी, गुणवडी, वाटेफळ, खुंटेफळ, कोयाळ, मठपिंपरी आदी गावातील शेतकरी सूर्यनाम्यात सहभागी होणार आहेत.

गेली ३० वर्षे लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी शेकडो पुढाऱ्यांनी साकळाई योजना नक्की करण्याच्या भूलथापा दिलेल्या आहेत. परंतु गेल्या दोन पिढ्यांचे नुकसान होऊन, लाभार्थी गावांना कुकडी प्रकल्पातून पिंपळगाव पिसा तलावातून साकळाई उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून पाणी मिळालेले नाही. कुकडी प्रकल्पातील सर्व धरणांचा फायदा पुणे जिल्ह्यातील सधन शेतकऱ्यांना पिढ्यान–पिढ्या होत आहे. ज्यांच्याकडे सत्ता त्यांनी सिंचन पाणी आपल्या भागासाठी वळविले. परंतु दुष्काळी भागाला कायमचे तहानलेले ठेवलेले आहे. त्यामुळे साकळाई योजना कृती समितीने शेतकरी संरक्षण कायदा होण्यासाठी प्रयत्न सुरू केला आहे. त्याचबरोबर युद्ध पातळीवर साकळाई योजना कार्यान्वीत व्हावी म्हणून सूर्यनामा केला जाणार असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

या सूर्यनाम्यामुळे या भागातील मतदारसंघात वर्षानुवर्षे बिनबोभाट निवडून येणाऱ्या पुढाऱ्यांना घाम फुटला आहे. खोटे आश्वासन देऊन मतांची खैरात घेऊन पाच वर्षे निघून जाणाऱ्या पुढाऱ्यांना शेतकरी वर्ग या विधानसभेत धडा शिकवणार असल्याची भावना ॲड. गवळी यांनी व्यक्त केली आहे.

या आंदोलनासाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, रईस शेख, वीरबहादूर प्रजापती, सुधीर भद्रे, शाहीर कान्हू सुंबे, प्रकाश थोरात, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ...तर जडेल मधुमेह

माऊथवॉशची सवय मधुमेहाला कारणीभूत ठरू शकते. दिवसांतून दोन किंवा अधिक वेळा माउथवॉशचा वापर केल्याने मधुमेह जडू शकतो. आपल्याला हा तर्क थोडा विचित्र वाटू शकतो. पण हे कसं घडतं याचं स्पष्टीकरण शास्त्रज्ञ देतात. आपल्या तोंडात चांगले आणि वाईट असे दोन्ही बॅक्टेरिया असतात. माउथवॉशमुळे या दोन्ही प्रकारच्या बॅक्टेरियांचा नायनाट होतो. म्हणजेच वाईटांबरोबर चांगले बॅक्टेरियाही नाहिसे होतात. अर्थातच तोंडाचं आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी चांगल्या बॅक्टेरियांची गरज असते.

## पाककला

### मुगाचे धिरडे

**साहित्य :** हिरवे मूग, कांदा, कोथिंबीर, ओल्या मिरच्या, मीठ, तेल.

**कृती :** मूग दोन तास भिजत घालावेत. नंतर मिरच्या व मूग एकत्र बारीक वाटावे. वाटलेल्या गोळ्यात मीठ घालावे. कांदा व कोथिंबीर चिरून ठेवावी. वाटलेल्या गोळ्यात जरूर तेवढे पाणी घालून तव्यावर धिरड्याइतपत जाड पसरावे. धिरडे झाल्यावर तव्यावरच असताना धिरड्यावर चिरलेला कांदा व कोथिंबीर घालावी व डोशाप्रमाणे गुंडाळी करावी. हिरव्या रंगामुळे हा धिरड्याचा प्रकार चांगला दिसतो. मूग वाटून झाल्याबरोबर लगेचच धिरडे घालावे. त्यामुळे मुगाचा हिरवा रंग राहतो.

## वास्तू

### प्लॉटची दिशा कोणती असावी

* आपल्या प्लॉटला लागून दुसरा प्लॉट घ्यायचा असल्यास उत्तर अथवा पूर्व दिशेकडचा घेणे लाभदायी असते.

* ज्या प्लॉटमध्ये रस्ता येऊन संपतो असा प्लॉट कधीच घेऊ नये.

* ऑफिसमध्ये आपल्या पाठीमागील बाजूस (शक्यतो दक्षिण ते पश्चिम) आपणास पूजनीय असलेल्या व्यक्तीचा फोटो लावावा.

## सल्ला

पाक केल्यानंतर साखरेचे पुन्हा कण बनू नयेत म्हणून पाकात थोडे लिंबू पिळावे.

## सौंदर्य

ऑफिसमध्ये भडक मेकअप तुमची इमेज बिघडवतो. यासाठी ज्या मेकअपने तुम्हाला अस्वस्थ होते तो मेकअप करू नका. तुम्ही सहज वावरू शकाल असा मेकअप करा अन्यथा कामात तुमचे लक्ष लागणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४**

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, आर्द्रा २९|३९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आपल्या कार्यक्षेत्रातील किंवा आपल्या व्यापारातील इतर लोकांशी व्यवहारीक मतभेद होतील.

**वृषभ :** अधिक श्रम करावे लागतील. पळापळ देखील अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या. वातावरण अनुकूल राहील.

**मिथुन :** एखाद्या मित्राशी झालेली भेट दिलासा देईल. व्यवसायातील अनेक कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क :** कौटुंबिक पाठिंबा देखील मिळणार नाही. वाहने अधिक काळजीपूर्वक चालवाल. जिद्दीने व चिकाटीने कार्यरत रहाल.

**सिंह :** आपणास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समर्थन मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. महत्त्वाची कामे पूर्ण करू शकाल.

**कन्या :** आज आपणास कठोर श्रम करावे लागेल. धार्मिक कार्यामध्ये खर्च होण्याची शक्यता आहे. वैवाहिक सौख्य लाभेल.

**तूळ :** आजचा दिवस कालच्या दिवसापेक्षा चांगला नसेल. मानसिक स्थिती आल्हाददायक राहील.

**वृश्चिक :** आरोग्याची काळजी घ्याल. व्यस्त राहाल. कौटुंबिक विषयांमध्ये पैसा खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील.

**धनु :** मानसन्मानाचे योग येतील. दैनंदिन कामात सुयश लाभेल. उधारी उसनवारी वसुल होईल. पितृचिंता सतावेल.

**मकर :** चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. मानसिक स्थिती आनंददायक राहील.

**कुंभ :** काळजीपूर्वक कार्य कराल. संभाषणात सावधगिरी न बाळगल्याने अडचणीत याल. देवाण-घेवाण काळजीपूर्वक कराल.

**मीन :** मनोबल व आत्मविश्वास वाढवणारी एखादी घटना घडेल. तब्येत बिघडू शकते. निराशा सतावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


पहिला मित्र - हॅलो भाई काय करतोस?
दुसरा मित्र - मस्त रे एकदम, काय म्हणतोस?
पहिला मित्र - अरे एक काम होते.
दुसरा मित्र - हा कर मग, थोड्या वेळाने निवांत बोलू.

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* मिठागारांचा जिल्हा कोणता? - रायगड
* भारताला सार्वभौमत्व कधी प्राप्त झाले? - २६ जानेवारी १९५०
* बलवंतराय मेहता यांच्या शिफारशींना पंचायतराज असे नाव कोणी दिले? - पं. नेहरू
* शुद्ध सोने ओळखण्यासाठी त्यावर कोणती निशाणी असते? - हॉलमार्क

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०३५ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) एक दिवंगत प्रसिद्ध शास्त्रीय गायिका ७) तुकडा; फोड (फळाची वगैरे) ८) एक ज्वालाग्राही पदार्थ ९) एक छोटा भित्रा जंगली प्राणी १०) हत्या; हनन; खून ११) दुर्योधन, भीम यांचे शस्त्र १२) कवितेत तुझे १४) मंत्र्याच्या नावाअगोदर लावतात तो सन्मानदर्शक शब्द १५) थंड; गार १७) इंग्रजी धाव १८) घट्ट नसलेले; साडी २०) मुलायमसिंग यांच्या पक्षाचे संक्षिप्त नाव २१) वर्ष; साल; शक २२) या काचेत प्रतिबिंब दिसते; दर्पण २३) एकाच जातीचे

**उभे शब्द :-** १) फायदेशीर; लाभदायक २) नाद; छंद; विलाप; दुःख ३) प्रार्थना; पूजा ४) एक प्रकारचे गवत ५) सकस; सत्त्वयुक्त ६) धरणी; वसुंधरा; पृथ्वी ११) गोंधळ; गडबड; गलका १३) ज्याला वतन आहे असा १६) लांगूलचालन; खुशामत १८) उत्तीर्ण १९) शोध; पत्ता; माग; ठावठिकाणा २१) मृत पतीच्या शरीराबरोबर स्वतःचे दहन करून घेणारी; पतिव्रता

**शब्दगंध क्र. ७०३४ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** संकटं टाळणं माणसाच्या हाती नसतं, पण संकटाचा सामना करणं, त्याच्या हातात असतं.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### मॅड काऊ डिसीज का होतो?

५ वर्षापूर्वी युरोपमध्ये विशेषतः इंग्लंडमध्ये प्राण्यांच्या या रोगाने हाहाकार माजवला होता. मॅड काऊ डिसीज म्हणजे शास्त्रीय भाषेत बोव्हाईन स्पॉन्जीफॉर्म एन्केफॅलोपॅथी. मूलतः शाकाहारी असणाऱ्या गाई-म्हशींना त्यांचे मांस वाढावे यासाठी प्राण्यांचे मांस-हाडे यांची भुकटी या देशांमध्ये दिली जात असे. याची परिणती या प्राण्यांमध्ये एका संसर्गक्षम प्रथिनाच्या अर्थात 'प्रायॉन'च्या निर्मितीत झाली व या रोगाची लागण जनावरांमध्ये होऊ लागली. अशी या रोगाची कारणमिमांसा दिली जाते. १०७० मध्ये या रोगाची सुरुवात गाईंमध्ये झाल्याविषयी शक्यता वर्तवली जाते.

१९८६ मध्ये हा रोग दोन गाईंना झाल्याची खातरजमा करण्यात आली. प्राण्यांचे मांस खाणाऱ्या व्यक्तींमध्ये मेंदूवर परिणाम करणाऱ्या क्रूट्झफील्ड-जॅकॉब रोगाचा एक प्रकार आढळून आला. कमी वयात होणारा गंभीर रोग जीवघेणा ठरतो. यामुळे मांस खाणाऱ्या लोकांमध्ये प्रचंड घबराट पसरली. इंग्लंडमधून मांस आयात करण्यास अनेक देशांनी निर्बंध घातले. इंग्लंडचे अर्थकारणही अडचणीत आले. यावर उपाय म्हणून इंग्लंडमध्ये रोगग्रस्त किंवा रोग असल्याच्या संशय असलेल्या गाई मारून टाकण्यात आल्या. तसेच शाकाहारी प्राण्यांना देण्यात येणाऱ्या आहारात मांस-हाडे यांची भुकटी टाकणे बंद करण्यात आले. त्यामुळे आज हा रोग बऱ्याच प्रमाणात आटोक्यात आला आहे. मॅड काऊ डिसीज व उपरोक्त मानवी रोग यातील संबंधामुळे मॅड काऊ डिसीजला महत्त्व प्राप्त झाले. निसर्ग नियमांच्या विरुद्ध वागल्यास काय होऊ शकेल याचे एक उदाहरण म्हणजे मॅड काऊ डिसीज होय. या उदाहरणातून माणसाने धडा घेतला नाही तर असे अनेक जीवघेणे रोग भविष्यात निर्माण होतील यात शंका नाही.

## लालची राजा

खूप खूप वर्षा पूर्वी मिडास नावाचा एक राजा होता. त्याला एक मुलगी होती. त्याची प्रजा खूप दुःखी होती कारण राजाला सोन्याचा फार हव्यास होता. सोने मिळवण्यासाठी काय वाटेल ते करायला तो तयार होता. आपल्या प्रजाजनांचीही लूट करून तो त्यांच्याकडून सोने हिरावून घेत असे. एक दिवस अचानक त्याला देवाचे दर्शन झाले. देवाने त्याला सांगितले, तू सोन्याचा हव्यास सोडून दे. त्याने तू ही दुःखी होशील आणि तुझी प्रजाही दुःखी होईल. पण मिडासने हे ऐकले नाही. तो देवाला म्हणाला, मला असे वरदान दे कि मी ज्या वस्तूला स्पर्श करेन ती सोन्याची होईल. देवाने पुन्हा पुन्हा राजाला धोक्याचा इशारा दिला. पण राजाचा हट्ट कायम होता . तेव्हा देवाने तसा वर मिडासला दिला व तो अदृष्य झाला. दिवसभर मिडास राजा घरातल्या प्रत्येक वस्तूला स्पर्श करून सोने बनवण्यात मग्न होता. त्याला तहान भुकेचीही आठवण राहिली नाही. शेवटी राणीने खूप आग्रह करून त्याला जेवायला बसवले. पण त्याला जेवताच येईना. तो ज्या पदार्थाला स्पर्श करी , तो सोन्याचा होई. खाणार काय अशी परिस्थिती झाली राजाची?

त्याची राणी व राजकन्या त्याच्याजवळ आल्या. पण मिडासने स्पर्श केल्याबरोबर त्यांचेही रूपांतर सोन्याच्या पुतळ्यात झाले. आता मात्र मिडासला पूर्ण कल्पना आली कि हा वर किती भयंकर आहे. मुकेने आणि प्रियजनांच्या विरहाच्या दुःखाने तो वेडापिसा होऊन गेला. त्याला पश्चाताप झाला. पण त्याचा आता काय उपयोग होता? शेवटी त्याने पुन्हा देवाची आराधना केली.देव पुन्हा आला आणि राजाने देवाची माफी मागितिली. देवाने सर्व पूर्ववत केले. आता राजा सोन्याचा विचार ही करत नाही.

**तात्पर्य :** अतिहव्यास हा विनाशालाच निमंत्रण देतो. त्यामुळे जे मिळेल त्यात सुखी राहावे. जास्तीची अपेक्षा विनाशच करते.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### जीवन की रोशनी

कि वह तब मरेगा जब ज़मीन लोहे की और आसमान सोने का होगा। क्योंकि यह दोनों चीज़ें सम्भव नहीं इसलिए बादशाह भूल में अपने आप को ओलम्पिन देवताओं की तरह अमर समझ बैठा। दूर पूर्व की लम्बी और थका देने वाली लड़ाइयों के पश्चात् वापिस यूनान लौटता हुआ जब वह बेबीलोन के रेगिस्तान में से जा रहा था तो उसे बुखार अ गया। जब घोड़े की काठी पर बैठा न रह सका तो उसे नीचे उतार लिया गया और उसके एक सेनापति ने अपना लोहे का कवच, जिसके अन्दर की ओर मखमल का कपड़ा लगा हुआ था, उसके नीचे बिछा दिया और रेगिस्तान की तेज धूप से उसे बचाने के लिये अपनी सोने की तारों से कढ़ाई की हुई छतरी उसके ऊपर कर दी। उस समय बहुत सारी लड़ाइयों को जीतने वाले (सिकन्दर) को अनुभव हुआ कि उसका अन्त समय निकट आ गया है क्योंकि वह उस समय लोहे की धरती पर पड़ा था और ऊपर सोने का चन्दोव था। वह भय से काँप उठा।

उसने अपने सबसे योग्य डाक्टरों की तरफ भरी हुई आँखों से देखा और विनती की कि वे उसे कम से कम कुछ समय के लिये बचा लें ताकि वह घर पहुँच कर अपनी प्यारी माँ से मिल सके परन्तु सभी ने असमर्थता प्रकट कर दी। उसने इतने समय के आराम के लिये उनको पहले अपना आधा राज्य और फिर सारा राज्य पेश कर दिया परन्तु ईश्वरीय संदेश को हटाने में कौन सहायता कर सकता है? दसवें दिन जब उसके सारे सेनापति एक एक करके उसके तम्बू में से जा रहे थे तो उसने उन्हें आदेश दिया कि उसका मृतक शरीर ले जाते समय उसके दोनों हाथ बाहर फैला कर रखे जायें ताकि सब लोग देख सकें कि एक महान सम्राट जिस तरह खाली हाथ दुनिया में आया था उसी तरह खाली हाथ यहाँ से जा रहा है।

इसी तरह हम विशाल क्षेत्र पर राज्य करने वाली एक महान और प्रतिभावान रानी की कहानी सुनते हैं। वह अपनी चकाचौंध कर देने वाली सुन्दरता और चतुराई के लिये अपनी प्रजा द्वारा पूजी जाती थी। उसने बहुत समय तक बड़ी चतुराई से बड़ी अच्छी तरह राज्य किया। हजारों नौकरों चाकरों में ऐश्वर्य सुखों में लालन पालन होने से उसके विचार में कभी भी नहीं आया था कि मृत्यु जैसी भी कोई चीज़ दुनिया में है।

जब उसका अन्त समय निकट आया तो वह बड़े शोक और तीव्र वेदना से भर गई। उसके बिस्तर के पास खड़े शाही हकीम उसके भय और कष्ट को ठण्डा करने के लिये कुछ न कर सके। जब मौत ने उसे दबोचना शुरू किया तो उन्होंने सांत्वना दी और अगली यात्रा के लिए तैयारी की प्रेरणा दी। क्या? वह डर गई, मैं कहाँ जा रही हूँ? उसने आश्चर्य से पूछा। अफसोस, उस दुनिया में जहाँ से कोई लौट कर नहीं आता। सरल सा उत्तर था। रानी को अपने कानों पर विश्वास न आया। क्या मैं स्वप्न ले रही हूँ? उसने पूछा। नहीं रानी साहिबा आपको जाना ही पड़ेगा। क्या कोई ऐसी दुनिया भी है जहाँ से वापिस नहीं आया जा सकता? यदि है तो कहाँ है? रानी ने पूछा। इस संसार से बहुत दूर है। दरबारियों ने कहा। क्या आप मुझे उसके विषय में समय पर पता करके नहीं बता सके? और मेरे वहाँ पर निवास काल के दौरान सुख आराम के लिए आपने क्या प्रबंध किया है? रानी ने पूछा।

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र

### अपने आप से प्रेम करना

जब मैं अपनी चेतना को भौतिक आयाम में वापस लाता हूँ तो प्रतिदिन की माँगों को बड़ी सरलता से पूरा करने के योग्य हो जाता हूँ; क्योंकि मैं इस संसार में अपनी भूमिका बिना किसी बाधा के पूरा कर पा रहा हूँ। मैं मुक्त भाव से अपनी आंतरिक विशेषताओं व ख़ूबियों को प्रकट करता हूँ और अच्छी तरह जानता हूँ कि केवल अपने सच्चे स्व की सजगता व अनुभव के बीच रहने से ही मैं अपने आसपास के परिवेश तथा लोगों पर गहन तथा सकारात्मक प्रभाव डाल सकता हूँ। अपने आंतरिक सौंदर्य व सत्य से संपर्क साधने के बाद मैं जानता हूँ कि किस अपने चुने हुए किसी भी समय पर सबकुछ त्याग सकता हूँ, क्योंकि यह हमेशा से मेरे भीतर है और हमेशा मेरे साथ रहेगा। मेरे जीवन का उद्देश्य पूरी तरह से स्पष्ट है। मुझे कुछ पाना या खोजना नहीं, बल्कि संपर्क साधना तथा देना है। सुबह-शाम दस मिनट इसी ध्यान के साथ बिताएँ; आप अपने जीवन में एक भारी बदलाव पाएँगे।

यदि आप राजयोग ध्यान के बारे में अधिक जानकारी चाहते हैं तो अपने निकटतम ब्रह्माकुमारी केंद्र से संपर्क करें। अधिक जानकारी के लिए परिशिष्ट ४ देखें या निम्न पते पर संपर्क करें

संसार को बदलने के दस उपाय -

मानवता के पिछले कर्मों के परिणामवश ही हम संसार की वर्तमान निराशाजनक अवस्था देख रहे हैं।

हम चुनौतियों के प्रति जो तकनीकी व राजनीतिक समाधान निकाल रहे हैं, वे पर्याप्त नहीं हैं। हमें पूरे संसार के लोगों के दिल व दिमाग में भारी बदलाव लाना होगा; उन्हें यह बोध देना होगा कि यह संसार तभी बदल सकता है, जब हम स्वयं अपने आपसे, दूसरों से तथा प्रकृति से अपने संबंध में बदलाव लाएँगे।

अपनी चेतना में बदलाव लाते हुए तथा अपनी अंतरात्मा से साक्षात्कार करते हुए हम सहज व स्वाभाविक रूप से निरंतर इस संसार को एक स्वच्छ, स्वस्थ, सुरक्षित तथा पहले से कहीं अधिक सुंदर स्थान बना सकेंगे, जिसमें मनुष्य तथा दूसरे जीव परस्पर शांति व सामंजस्य के बीच जीवन-यापन कर सकेंगे। यहाँ वे दस शक्तिशाली उपाय दिए जा रहे हैं, जिनके माध्यम से आप संसार को बदलने में मदद कर सकते हैं- सादगी के साथ जिएँ जब हम पूरी बुद्धिमत्ता और सावधानी के साथ अपनी इच्छाओं के स्थान पर जरूरतों के आधार पर अपने मानसिक, भावात्मक व भौतिक संसाधनों का प्रयोग करते हैं तो हम पृथ्वी के संरक्षकों के रूप में अपने उत्तरदायित्व को पूरा करने में सफल हो पाते हैं। जब हम अपने आध्यात्मिक सार को सबसे जोड़ते हुए लिंग, जाति, संस्कृति

भविष्य के लिए आपकी परिकल्पना या दर्शन जितना सकारात्मक, शक्तिशाली व विस्तृत होगा, उसे पाना उतना ही आसान होगा।

ध्यान व मनन में समय व्यतीत करने से हमें आंतरिक शांति प्राप्त होती और हम जीवन को कहीं अधिक सकारात्मक व शांतिपूर्ण तरीके से जीने का विवेक हासिल कर पाते हैं ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### षोड्श संस्कार (सोळा संस्कार)

त्या वेळेस प्रथमतः अन्नाची पूजा करून अन्नप्राशन संस्कार केला जातो. सहाव्या महिन्यामध्ये बाळाला वरण भाताचे पाणी, फळांचे रस, नाचणी सत्त्व सुरू करावे. यातील पहिले अन्न बाळाला देताना या अन्नापासून माझ्या बाळाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होऊन त्याच्या आरोग्याचे रक्षण व्हावे अशी ईश्वराजवळ प्रार्थना करावी व खालील अन्नपूर्णा देवीचा मंत्र म्हणून बाळाला पहिला घास भरवावा.

अन्नपूर्णा देवी मंत्र : **श्री ह्रीं क्लीं नमो भगवति अन्नपूर्ण ममाभिलषितमन्नं देहि देहि स्वाहा । दर्शनसिद्धि भवति ।।**

**८) कर्णवेधन संस्कार :** बाळ सव्वा महिन्याचे झाल्यानंतर शुभदिवशी कान टोचले जातात. मुलगा असल्यास पहिल्यांदा उजवा कान व मुलगी असल्यास पहिल्यांदा डावा कान टोचवावा यालाच कर्णवेधन संस्कार म्हणतात.

**९) मुंडण संस्कार :** जन्मानंतर काही महिन्यांनी शुभदिवशी बाळाचे जावळ काढतात यालाच मुंडण संस्कार म्हणतात.

**१०) उपनयन संस्कार :** या उपनयन संस्कारालाच मुंज करणे असे म्हणतात. उपनयनचा अर्थ जवळ घेऊन जाणे. हा संस्कार, वयाच्या आठव्या वर्षी केला जातो. बालक आध्यात्मिक जीवनात प्रवेश करतो; म्हणून त्याचा दुसरा जन्म मानला जातो. शुभदिवशी अन्नदेवता, ब्राह्मण व वैद्य यांचे पूजन करावे व अग्निकुंडामध्ये दही, मध, साजूक तूप यांची आहुती द्यावी. ॐ भूः स्वाहा: या ॐकाराचा विधीपूर्वक जप करून घृताची आहुती देत राहावी. **११) वेदारंभ संस्कार :** बालकाचे वय शिक्षणाच्या योग्य झाल्यानंतर गुरु किंवा पित्याकडून हा संस्कार केला जातो. आपले बालक वयाच्या चौथ्या व पाचव्या वर्षी ज्ञानार्जनासाठी जेव्हा शाळेत जाईल त्या शुभदिवशी वेदारंभ संस्कार करावा.

**१२) समावर्तन संस्कार :** शिक्षण संपल्यानंतर ज्ञानार्जन प्राप्त करून परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाल्यावर आपल्या गुरुंकडून आशीर्वाद घेऊन गुरुकुलाचा म्हणजेच आताच्या काळात कॉलेजचा निरोप घेण्याच्या क्रियेला समावर्तन संस्कार म्हणतात.

**१३) विवाह संस्कार :** योग्य वय असलेले स्त्री व पुरुष आयुष्यभर एकमेकांची साथ देण्यासाठी व अपत्य जन्माच्या हेतूने एकत्र येतात, एकमेकांशी बांधले जातात. यालाच विवाहसंस्कार म्हणतात. विवाहसंस्कारामधून गृहस्थाश्रमाची सुरुवात होते. पुरुषाचे विवाह करते वेळी वय कमीत कमी २५ वर्षे असावे व तो शक्तिसंपन्न असावा आणि स्त्रीचे वय कमीत कमी १८ वर्षांचे किंवा त्याहून अधिक असावे.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर,
मोबाईल नं- ८७९३४०४०००

# लघुउद्योजक आणि लघुउद्योग अर्थव्यवस्थेचा कणा

**चंद्रशेखर लुणिया यांचे प्रतिपादन**

नगर – अर्थव्यवस्थेतील 'अर्थ' हा सर्वात प्रमुख आणि मोठा घटक असून कोणताही बडेजावपणा टाळून अनावश्यक कर्ज न घेता आर्थिक व्यवहार व समीकरणे जुळवून आणणे आवश्यक असून लघुउद्योग आणि उद्योजक अर्थव्यवस्थेचा कणा असतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ सनदी लेखापाल, व्यावसायिक चंद्रशेखर लुणिया यांनी केले.




ब्राम्हण बिझनेस नेटवर्क वेल्फेअर असोसिएशन आणिा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज् आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना चंद्रशेखर लुणिया. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित व्यावसायिक.

ब्राह्मण बिझिनेस नेटवर्क वेलफेअर असोसिएशन आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यवसाय आणि आर्थिक व्यवहाराची गणिते आणि 'व्यवसायास उपयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता व साधने 'या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे उपसंचालक महेश कबाडी, प्रकल्प समन्वयक अमेय मिसाळ, ए आय तज्ज्ञ गौरी काळे, मिलिंद कुलकर्णी उपस्थित होते.

श्री. लुणिया पुढे म्हणाले की, व्यवसाय सुरू करताना आवश्यक त्या कायद्यांची माहिती आपणास आवश्यक असून कायदे समजून घेणे हितावह आहे. आपल्या व्यवसायाचे गणित दररोज मांडणे आवश्यक असून आपल्या सनदी लेखापालाशी वर्षातून ३–४ वेळा भेटून आपल्या व्यवसायातील व्यवहार्यता नफा तोटा, इतर पर्याय आदी विषयांवर चर्चा करून योग्य उपाययोजना करावी. कर्ज घेतल्यानंतर कमीत कमी कालावधीत त्याची फेड केल्यास पत सुधारते, याकरिता प्रयत्नशील राहणे हे व्यावसायिकांचे आद्य कर्तव्य आहे. अनेक अनुभव यावेळी लुणिया यांनी प्रस्तुत केले.

'व्यवसायास उपयुक्त कृत्रिम बुद्धिमत्ता' या विषयावर बोलताना गौरी काळे यांनी चॅटजीपीटी, ए आय या साधनांचा उपयोग स्वतःसाठी आणि व्यावसायिक वापरासाठी कसा करावा, याचे प्रात्यक्षिक सादर केले. कृत्रिम बुद्धिमत्ता हा विषय अत्यंत सोपा असून शिकून व्यवसायास वेगळ्या उंचीवर नेण्यासाठी ए आय साधनांचा वापर जरूर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक निखिल कुलकर्णी यांनी केले तर अतिथी परिचय व स्वागत अमित काळे यांनी केले. या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी शिल्पा सोमणी, हेमंत लोहगावकर, शैलेश राजगुरू, स्नेहल धर्माधिकारी, अमित परांडकर, विनीत मुंगी, उमेश भालेराव आदींनी परिश्रम घेतले. नगरमधील अनेक व्यावसायिक या कार्यशाळेस उपस्थित होते.

# जायकवाडीच्या एक्सपोर्ट पाण्यातून वंचित भागाचा पाणीप्रश्न मार्गी लागेल

नगर – जायकवाडी धरणातून एक्सपोर्ट होणाऱ्या पाण्यातून वंचित भागाचा पाणीप्रश्न मार्गी लागेल, अशा भावना जलतज्ज्ञ तथा निवृत्त कार्यकारी अभियंता जयप्रकाश संचेती यांनी व्यक्त केल्या.



जलतज्ज्ञ जयप्रकाश संचेती यांच्याशी चर्चेप्रसंगी लोकलढा आंदोलक.

लोकलढा आंदोलनातील संयोजकांनी शनिवारी अहिल्यानगर येथे जलतज्ज्ञ संचेती यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते.

जायकवाडीच्या पाण्यासाठी गेवराई तालुक्यातील सिंदफणा पट्ट्यातील (बीड जिल्हा) १४० गावच्या शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभारले आहे. या आंदोलनाचे संयोजक दिनेश गुळवे, कुक्कडगाव येथील राजाभाऊ महाराज कुटे, देविदास चव्हाण, महादेव रडे, गणेश जाधव यांनी शनिवारी स्नेहालय कार्यालयात संचेती यांच्याशी चर्चा केली.

यावेळी मार्गदर्शन करताना जयप्रकाश संचेती म्हणाले की, नव्या जल आराखड्याप्रमाणे दोन हजार दशलक्ष घन मीटर पाणी एक्सपोर्ट (खाली सोडले जाणार आहे) केले जाणार आहे. यातील काही पाणी वंचित भागाकडे वळविल्यास पाणीप्रश्न मार्गी लागेल. मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेतुनही पाणी मिळण्यासाठी करावयाचे प्रयत्न, मराठवाड्यातील पाणी प्रश्न व पाणी परिस्थिती, कशा प्रकारे पाठपुरावा करावा आदी संदर्भात जयप्रकाश संचेती यांनी चर्चा करत मार्गदर्शन केले. यावेळी लोकलढा आंदोलनाच्या संयोजकांनी जयप्रकाश संचेती यांचे आभार मानले.



आंतरमहाविद्यालयीन खो–खो (मुले) स्पर्धाचे उद्घाटन करताना सचिव ॲड. विश्वासराव आठरे समवेत खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, प्राचार्य बी.बी. सागडे, उप प्राचार्य जे. ई. आठरे, डॉ. शरद मगर, डॉ.धोपावकर सर, डॉ.संतोष भुजबळ, प्रा.श्रीमती बागुल, प्रा.मनीषा पुंडे, डॉ.किसन अंबाडे, प्रा.अमन बगाडे, प्रा. योगिता खेडकर आदी. (छाया – सागर इंगळे)

# खेळामुळे सरकारी नोकरीतही प्राधान्य

**ॲड. विश्वासराव आठरे यांचे प्रतिपादन**

नगर – मैदानी स्पर्धेमुळे मुलांचा शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होणार आहे. येणाऱ्या काळात मुले शारीरिकदृष्ट्या सक्षम होतील. स्पर्धेतून मुलांमध्ये खेळाची आवडत निर्माण होणार आहे. खेळामुळे सरकारी नोकरीतही प्राधान्य असून, व प्रशिक्षकांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे यांनी शुभेच्छा दिल्या.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अहमदनगर जिल्हा क्रीडा विभाग आणि न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन खो–खो (मुले) स्पर्धा वेळी आठरे बोलत होते. यावळी खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, बी.बी.सागडे, उपप्राचार्य जे. ई. आठरे, डॉ. शरद मगर, डॉ.धोपावकर सर, डॉ.संतोष भुजबळ, प्रा.श्रीमती बागुल, मनीषा पुंडे, डॉ.किसन अंबाडे, प्रा.अमन बगाडे, प्रा. योगिता खेडकर उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य बी.बी.सागडे यांनी केले. मुलांना शिक्षणाबरोबर खेळालाही महत्त्व देवून अभ्यास व खेळ याची सांगड घालून वाटचाल केल्यास शैक्षणिक जीवनाचा आनंद लुटता येणार असल्याचे सांगितले.

स्वागत जिमखाना प्रमुख डॉ. शरद मगर यांनी केले. प्रा.सुनीता मोठे यांनी सूत्रसंचालन केले. जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ.पंडीत यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. धन्यकुमार हराळ, तुषार चौरे, बाळू कोतकर यांनी परिश्रम घेतले. तर स्पधे साठी पंच म्हणून विकास परदेशी, अशोक कळसे, तेजस मगर, निलेश शेळके, अतुल मगर यांनी काम पाहिले.

## अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या

# अध्यक्षपदी सुनिल पंडित तर राजेंद्र सोनवणे कार्याध्यक्ष, मिथुन डोंगरे सरचिटणीस

नगर – अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची जिल्हा कार्यकारणी व सर्वसाधारण सभा मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालय संगमनेर येथे अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष व राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी संघाचे माजी सरचिटणीस शांताराम डोंगरे उपस्थित होते. या सभेत पुढील पाच वर्षासाठी खालील प्रमाणे सर्वानुमते जिल्हा कार्यकारिणीची एकमताने निवड करण्यात आली.



अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाची जिल्हा कार्यकारणी व सर्वसाधारण सभा मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालय संगमनेर येथे झाली.

अध्यक्ष प्राचार्य सुनिल पंडित नगर यांची फेरनिवड करण्यात आली तर कार्याध्यक्ष राजेंद्र सोनवणे (अकोले), सरचिटणीस मिथुन डोंगरे (पाथर्डी), संघटन मंत्री सचिव संजय लहारे (संगमनेर), कार्यालय मंत्री मंगेश जाधव (पारनेर), खजिनदार एम.जी.राऊत (पारनेर), उपाध्यक्ष राजेंद्र वाघ (पारनेर), आबासाहेब गडदे (आबा) (राहुरी), बाळासाहेब सूर्यवंशी (जंगले) (श्रीगोंदा), बाळासाहेब वाघ (कर्जत), प्रकाश देशमुख (कोपरगाव), बालाजी गायकवाड (शेवगाव), आबासाहेब गडदे (राहुरी), सहसचिव उद्धव सोनवणे (नेवासा), एस. बी. उकिर्डे (अकोले), एस. एस. पवार (नगर तालुका), आर. एस. औताडे (श्रीरामपूर), निरंजन डांगे राहता, शेख जमीर नगर तालुका, विद्या सचिव सुनिल धुमाळ (अकोले), सहविद्या सचिव श्रीकृष्ण पवार (नगर), हिशोब तपासणी सौ. संगीता म्हस्के (संगमनेर).

महिला आघाडी प्रमुख –सौ. संगीता हासे (अकोले), उपाध्यक्षा ज्योत्स्ना शिंदे (नगर), सचिव डॉ.सुनिता पारे (कोपरगाव), इंग्रजी माध्यम प्रमुख गीता तांबे (नगर), रात्र शाळा प्रमुख सुनिल सुसरे(नगर), राज्य कार्यकारणी सदस्य दशरथ कोपनर (अकोले), सौ. शितल बांगर (नगर), सुनिल भोर (श्रीगोंदा), पुणे विभागीय सदस्य निवृत्ती इले (राहुरी), अशोक दौड (पाथर्डी), भाऊसाहेब रोहकले (नगर तालुका), प्रमुख तज्ञ मार्गदर्शक प्राचार्य विजय पोकळे, उल्हास दुगड, प्रमोद तोरणे (भिंगार कॅन्टोन्मेंट), यशवंत भुतकर, कैलास काकडे, मार्गदर्शक शांताराम डोंगरे, कळसकर, बापूसाहेब काळदाते, आनंता खेत्रे, बी टी गमे, बाळासाहेब बनकर, बाळासाहेब वाकचौरे, दत्ता भांडवलकर, सौ. लता डांगे, अभिमन्यू चव्हाण, बा. ल. ठोकळ आदींचे बिनविरोध निवड करण्यात आली.

आभार सरचिटणीस मिथुन डोंगरे यांनी मानले.



कानडे मळा येथील माउंट लिटेरा झी स्कूल शाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत मार्गदर्शन करताना आयुक्त यशवंत डांगे.

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी महापालिकेकडून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

नगर – महापालिकेच्यावतीने दिवाळी उत्सवात पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. कानडे मळा येथील माउंट लिटेरा झी स्कूल शाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबाबत, स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डेंग्यू, चिकणगुनिया आजारांपासून लांब राहण्यासाठीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. दिवाळीत प्लास्टिकचा आकाश कंदील वापरू नये. रांगोळी केमिकलची न वापरता फुलाची पर्यावरण पूरक काढावी. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. येणारी दिवाळी स्वच्छ व सुंदर साजरी व्हावी, यासाठी विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांनीही नियमांचे पालन करण्याबाबत, स्वच्छता राखण्यासाठी शपथ घेतली.

स्वच्छतेविषयी विद्यार्थ्यांना महत्त्व पटवून देताना ओला–सुका कचरा विलगिकरण, तसेच ओला आणि सुका कचरा कोणता असतो, याची ओळख करून देण्यात आली. स्वतःचे व इतर नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, यासाठी व आपल्या शहराला स्वच्छ, सुंदर करण्यासाठी, नियमांचे पालन करण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले.

# एनआरआय वर्ल्ड ऑफ अहिल्यानगरचा स्नेहमेळावा

नगर– नगरमधील ज्या पालकांचे मुले, मुली, सुना व जावई परदेशात आहेत अश्या पालकांचा एन आर आय वर्ल्ड ऑफ अहिल्यानगर चा स्नेहमेळावा नुकताच अहिल्यानगर येथील माणिकनगर भागातील एका हॉटेलवर पार पडला. या मेळाव्यात ५५ पालकांनी उपस्थिती नोंदवली. यांच्या व्हाट्सअप ग्रुपची निर्मिती साडेपाच वर्षांपूर्वी झालेली आहे. प्रास्ताविक प्रा. संगीता भागवत यांनी केले. त्यांनी सर्व प्रथम गणेश पूजा केली व त्यानंतर याच्या आधी झालेल्या स्नेहमेळाव्याची माहिती दिली व कार्यक्रमाचे पूर्ण सूत्रसंचालन केले.




माणिकनगर भागातील एका हॉटेलमध्ये एन.आर.आय.वर्ल्ड ऑफ अहमदनगरच्या स्नेहमेळाव्यात सहभागी झालेल्या स्मिता फडके, डॉ.श्यामा मंत्री आदी. दुसऱ्या छायाचित्रात सहभागी झालेले डॉ.पोंदे आदी पुरुष मंडळी.

डॉ. दत्ता पोंदे यांनी अश्या प्रकारचा ग्रुप स्थापन करण्याची काय गरज होती हे सांगितले. या ग्रुपमुळे परदेशी जाणाऱ्या मुला–मुलींच्या प्रवाशासंबंधी, व्हिसा संबंधी, कागदपत्रांसंबंधी किंवा तिथे राहण्याच्या दृष्टीने काही अडीअडचणी निश्चितच या ग्रुपद्वारे दूर होऊ शकतात असे डॉ. पोंदे यांनी सांगितले. अविनाश कुलकर्णी यांनी सदस्यांना भारतातील प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन व डॉक्युमेंटेशन संदर्भात मार्गदर्शन केले.

सदस्यांनी आपआपली ओळख करून दिली व आपली मुले–मुली परदेशात कशी गेली व कुठे गेली याचे अनेक मजेशीर व कौतुकास्पद किस्से सांगितले. त्यानंतर पालकांचे न्यूयॉर्क, टेक्सास, कॅलिफोर्निया, शिकागो, युरोप व ऑस्ट्रेलिया असे वेगवेगळे ग्रुप तयार करण्यात आले. त्या त्या भागातील मुलं–मुली असणाऱ्या पालकांनी आपापल्या विचारांची देवाण–घेवाण केली.

सविता धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले व सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्मिता फडके, मिनाक्षी पाठक, डॉ. श्यामा मंत्री, अनघा बंदिष्टी यांनीही प्रयत्न केले.

नगर शहरातील व जिल्ह्यातील ज्या नागरिकांचे जवळचे नातेवाईक परदेशात आहेत किंवा चाललेत ते या व्हाट्सअप ग्रुपमध्ये जॉईन होऊ शकतात. त्यांनी डॉ. दत्ता पोंदे यांच्या ७३८७ ९०० ७०० या क्रमांकावर संपर्क साधावा. सामाजिक बांधिलकी जपणारा ग्रुप विनामूल्य आहे. कोणतीही नोंदणी वा सभासद फी नाही याची नोंद घ्यावी.

# विविध क्षेत्रात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक सभागृहाचा उपयोग होईल

**हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक यांचे प्रतिपादन; सीताराम सारडा विद्यालयात 'केशव दामोदर जोशी' या नुतन सभागृहाचे उद्घाटन**

नगर – श्रीमती कमलताई जोशी व डॉ. विद्याधर पुंडे यांच्या योगदानातून अद्यावत असे सभागृहाची निर्मिती झाली आहे. कमलताई जोशी यांनी दाखवलेल्या दातृत्वामुळे सिताराम सारडा विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या कलाक्षेत्रात वाटचाल करण्यासाठी कै.केशव दामोदर जोशी हे सभागृह निर्माण झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आनंदाचा मळा फुलला आहे. सभागृहाचा योग्य उपयोग करून विद्यार्थी तुमच्या मनोकामना पूर्ण करतील. वक्तृत्व स्पर्धा, नाट्य, संगीत, कला अशा विविध क्षेत्रात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक सभागृहाचा उपयोग होईल, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी केले आहे.



सीताराम सारडा विद्यालयात केशव दामोदर जोशी या नुतन सभागृहाचे उद्घाटन श्रीमती कमलताई दामोदर जोशी व डॉ.विद्याधर पुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाचे सीताराम सारडा विद्यालयात केशव दामोदर जोशी या नुतन सभागृहाचे उद्घाटन श्रीमती कमलताई दामोदर जोशी व डॉ.विद्याधर पुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक होते. तर प्रमुख उपस्थितीत हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, सीताराम सारडा विद्यालयाचे माजी चेअरमन प्रा.मकरंद खेर, चेअरमन अजित बोरा, कार्यकारणी सदस्य सुमतीलाल कोठारी, जगदीश झालानी, रणजीत श्रीगोड, सौ.वैशाली जोशी, शालेय समिती सदस्य ईश्वर बोरा, सचिन चोपडा, ॲड.दीपक शर्मा, सौ.स्मितताई तिखे, ॲड.मंगलताई कोठारी, सुधाकर तिखे, डॉ.मनोहर देशपांडे, किशोर खुरंगे, माजी मुख्याध्यापिका बोगावत मॅडम, निर्मलाताई भंडारी, संजय मुदगल, विठ्ठल उरमुडे, सहाय्यक सचिव बि. यु. कुलकर्णी, विलास साठे, शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल ढगे, पर्यवेक्षक गोविंद धर्माधिकारी, सुनील कुलकर्णी, दीपक आरडे, नितीन केणे, दीपक शिरसाठ, रवींद्र चोभे, अमोल कदम, अशोक डोळसे, गोवर्धन पांडुळे आदींसह शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ.विद्याधर पुंडे म्हणाले, माझी बहीण कमलताई जोशी यांच्या पती व मुलाच्या निधनानंतर शाळेतील विद्यार्थ्यांसाठी काहीतरी समाज कार्य करावे असे त्यांनी सुचविले होते. मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांच्याशी संपर्क केला असता विद्यार्थ्यांना सभागृह बांधून मिळावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कमलताई जोशी यांनी सांगितले प्रमाणे चांगल्या गुणवत्तेचे व दर्जेदार असे सभागृह बांधण्यात आले. यासाठी सर्व हिंद सेवा मंडळाचे पदाधिकारी व शाळेतील शिक्षकांचे सहकार्य लाभले आहे. या सभागृहाचा वापर शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्य, संगीत व कला क्षेत्रात करून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास करावा.

संजय जोशी म्हणाले, प्रा.मकरंद खेर यांच्या माध्यमातून शाळेला मोठी देणगी मिळाली आहे. नूतन सभागृहाच्या बांधकामामुळे शाळेची उणीव भरून निघाली आहे. या सभागृहाचा उपयोग निश्चितच विद्यार्थी करतील व यशस्वी होतील.


मकरंद खेर म्हणाले, सीताराम साडा विद्यालयात आज देखण्या सभागृहाची भर पडली आहे.आजच्या काळात स्वतःपुरते विचार करणारे माणसे आहेत. परंतु समाजासाठी काम करणारी माणसे थोडीफार आहेत. त्यापैकी एक कमलाताई जोशी या आहेत. त्यांच्याविषयीची कृतज्ञतेची भावना कायम अशीच राहील.

अजित बोरा म्हणाले, नुतन सभागृहामुळे शाळेच्या वैभवात भर पडली आहे. तसेच मुलांच्या विविध कणाकुलांना वाव मिळेल.

कमलाताई जोशी म्हणाल्या, शाळेतील मुलांसाठी काहीतरी सामाजिक कार्य करण्याची इच्छा होती. आज कै.केशव दामोदर जोशी सभागृहामुळे विद्यार्थ्यांसाठी चांगली वास्तू उभी राहिली आहे. यासाठी हिंद सेवा मंडळ व सर्व शिक्षकांचे सहकार्य मिळाले आहे. विद्यार्थ्यांनी सभागृहाचा योग्य वापर करून आपल्या कलेत भर टाकावी.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक विठ्ठल ढगे म्हणाले, सीताराम सारडा शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सभागृहाची निर्मिती झाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रगतीत निश्चितच भर पडेल. याचे सर्व पुण्य कमलाताई जोशी व परीवाराला मिळेल.

सुत्रसंचलन नितीन केणे व दिपक शिरसाठ यांनी केले तर आभार गोविंद धर्माधिकारी यांनी मानले.



**चित्रपट अभिनेत्री व मिसेस वर्ल्ड डॉ. आदिती गोवित्रीकर यांचा सत्कार**

चित्रपट अभिनेत्री व भारतातील एकमेव मिसेस वर्ल्ड डॉ. आदिती गोवित्रीकर यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट अबू येथे भेट दिली असता संस्थेच्या राजस्थानच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुषमादीदी यांच्या हस्ते शांतिवन मधील डायमंड हॉलमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी बी के डॉ. दीपक हरके.

# अविनाश देडगांवकर यांच्यामुळे म्हशीच्या वगारला जीवदान

नगर – छत्रपती संभाजीनगर–पुणे महामार्गवरील अहिल्यानगर



येथील डीएसपी चौकात पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पुढील नाल्यामध्ये म्हशीचे वगार पडले होते. देडगांवकरानी तातडीने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाला दूरध्वनीवरून म्हशीच्या वगारची माहिती दिली.

तातडीने महानगरपालिकेची अग्निशामकची गाडी डीएसपी चौकात आली. महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी नाल्यातील पडलेल्या म्हशीच्या वगारला सुखरूप नाल्याच्या वर काढले. अविनाश देडगांवकर यांच्यामुळे म्हशीच्या वगाराला जीवदान मिळाले.

यावेळी वाहतूक पोलीस संजय घोरपडे व महानगरपालिका अग्निशामक विभागाचे कर्मचारी चिंधू भांगरे, ज्ञानेश्वर चाकणे, शिवाजी गायकवाड, संदीप शिरसाठ, नाना सोलट, सिकंदर वाकुरे, दीपक डाके आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार शिक्षक प्रसाद शिंदे यांना जाहीर



नगर – शिक्षक प्रसाद शिंदे यांना राया क्रांतिकारक फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

फाऊंडेशनचे संस्थापक कृष्णा गोहिरे, आयोजक नामदेव जाधव यांनी सांगितले की, सामाजिक कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध विभागांतील व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो अहिल्यानगर येथील प्रसाद शिंदे यांना फाऊंडेशन माध्यमातून देण्यात येणार राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देताना विशेष आनंद होत आहे. शिंदे शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी अविरत कार्य करीत आहेत. शिक्षकांना न्याय मिळावा म्हणून त्यांनी अनेक आंदोलने केली आहेत.

रायझिंग ट्रायबल फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून शिंदे विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात. त्यामध्ये रक्तदान शिबिर, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण, आदिवासी बांधवांना घरकुले मिळावेत, जातीचे दाखले मिळावेत, मुलांना शिक्षण मिळावे, महिलांना रोजगार मिळावा, विविध योजनांचा फायदा आदिवासी बांधवांना मिळवून देण्यासाठी कार्य सुरू आहेत. पुरस्कार सोहळा नाशिक येथे पार पडणार आहे.

# घुसखोरमुक्त महाराष्ट्रासाठी केवळ भारतीय नागरिकत्व असलेल्यांनाच कामावर ठेवा

## सुरेश चव्हाणके यांचे आवाहन

नगर – देशात सुमारे १० कोटी घुसखोर आहेत, यातील ८० लाख ते १ कोटी महाराष्ट्रात तर नगर जिल्ह्यात ७५ ते ८० हजार घुसखोर आहेत. यामध्ये बांगलादेशी, अफगाणी, रोहिंगे, पाकिस्तानी यांचा मोठा सहभाग आहे. त्यामुळे राज्याच्या सुरक्षेला आणि संसाधनांना धोका निर्माण होत राज्यावर आर्थिक ताण, गुन्हेगारी आणि रोजगाराच्या संधींवर मोठा परिणाम होत आहे. यासाठी राष्ट्रीय नागरिकत्व कायदा आणणे आवश्यक आहे. यासाठी राज्यभर जनजागृती करण्यासाठी शिवप्रेरणा उपक्रमांतर्गत 'सजग रहो हे' अभियान राबवत आहोत. यामध्ये सर्व क्षेत्रातील नागरिकांचा सहभाग प्रत्येक जिल्ह्यात वाढत आहे. सर्व नागरिकांनी आपापल्या घरी, कंपनीत व दुकानांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नागरिकत्व स्वतः तपासावे. केवळ भारतीय नागरिकत्व असलेल्यांनाच कामावर ठेवावे. जनता एनआरसी अंतर्गत या घुसखोरांची ओळख पटविणे आणि त्यांना देशातून हाकलून देऊन महाराष्ट्राला घुसखोर मुक्त राज्य करण्यासाठी सर्वांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन हिंदुत्ववादी नेते सुरेश चव्हाणके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.




पत्रकार परिषदेत बोलताना सुरेश चव्हाणके.

सुरेश चव्हाणके यांची शिवप्रेरणा यात्रेचे नगरमध्ये आगमन झाल्यावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी सुधीर लांडगे, कर्नल नरेश गोयल व परदेशी उपस्थित होते.

सुरेश चव्हाणके पुढे म्हणाले, हे अभियान मुस्लिम विरोधात नसून भारतात जो कोणी बेकायदेशीर पणे राहत असेल त्यांना कायद्याने देशा बाहेर काढण्यासाठी ही मोहीम आहे. देशातील मुस्लीम जनतेनेही आमच्या बरोबर येऊन घुसखोरांना देश बाहेर काढण्यासाठी सहकार्य करावे. केवळ राज्यातून या घुसखोरांना बाहेर काढले तर ४० लाख स्थानिकांना रोजगार उपलब्ध होवू शकतो. त्यामुळे सर्व जनतेने जागरूक होणे वश्यक आहे. सर्व जाती धर्मांच्या जनतेने या जनता एनआरसी अभियानात सहभागी होण्यासाठी ९२०९२०४२०२४ या नंबरला मिसकॉल द्यावा.

या लोक अभियानांतर्गत आम्ही सर्व जनतेला केवळ भारतीय नागरिकत्व असलेल्या नागरिकांचा कामावर ठेवावे. तसेच जात, धर्म न पहाता राज्यातील सर्व ग्रामपंचायतीच्यासरपंचांनीआपापल्या गावाची नागरिकत्व तपासणी करावी. या माध्यमातून हळूहळू सर्व गाव, तालुका, शहर, राज्य व नंतर देशात नागरिकत्व तपासण्याची मोहीम सुरु होण्यासाठी हे अभियान आहे. आजपर्यंत महाराष्ट्रातून सुरु झालेले सर्व आंदोलने यशस्वी झाले आहेत. त्यामुळे शिव प्रेरणा उपक्रमांतर्गत सजग रहो हे अभियान राज्यातून सुरु केले आहे, असे सुरेश चव्हाणके यांनी सांगितले. प्रारंभी सुधीर लांडगे यांनी प्रास्ताविक केले.



श्री लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचालित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत दिवाळी निमित्त आयोजित साहित्य खरेदी मेळाव्याप्रसंगी मृणालताई कनोरे, मुख्याध्यापिका कल्पना भामरे आदी शिक्षिका.

# संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत रंगला दिवाळी साहित्य खरेदी मेळावा

## विद्यार्थी बनले दुकानदार तर पालकांनी केली खरेदी, किल्ले बनवा उपक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

नगर – श्री लक्ष्मीनारायण शिशु शिक्षण मंदिर संचलित संस्कृती श्रीनिवास कनोरे प्रशालेत चला दुकानदार होऊ या! हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी लागणारे आकाश कंदील, पणत्या, पुजेसाठी लागणारे ताट, तोरण, रंगिबेरंगी विविध सजावटीचे बनविलेल्या वस्तूंचे स्टॉल लावले होते. या स्टॉलवर पालक वर्गांनी दिवाळीच्या खरेदीसाठी गर्दी केली होती. मुलांना व्यावहारिक ज्ञान आत्मसात होण्यासाठी हा आगळा-वेगळा उपक्रम शाळेत राबविण्यात आला.

तसेच मुलांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहिती होण्यासाठी किल्ले बनवा उपक्रम राबविले. यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रतापगड, तोरणा, रायगड आदी किल्लयांचे प्रतिकृती बनविले होते. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

यावेळी पालक शिक्षण समितीच्या व्हाईस चेअरपर्सन मृणालताई कनोरे, शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना भामरे आदींसह सर्व शालेय शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या. या दिवाळी साहित्य खरेदी मेळाव्यात तुझा कितीचा माल विकला?, किती माल शिल्लक राहिला? अशा आनंदी वातावरणात पालकांच्या उपस्थितीमध्ये दिवाळीची खरेदी विक्री रंगली होती.

उपस्थित पाहुणे देखील विद्यार्थ्यांच्या उपक्रमाने भारावून गेल्या. या उपक्रमासाठी जगन्नाथ कांबळे, सुशिलकुमार आंधळे, बबनभाई शेख, राजेंद्र गर्जे, चंदा कार्ले, अनिता जपकर, सुकन्या खरात, विद्या नरसाळे, रितीका राऊळ यांनी परिश्रम घेतले.

# दिवाळीत घरांवर झळकणार विद्यार्थ्यांनी बनवलेले आकाश कंदील

नगर – शहरातील कापड बाजार येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची दिवाळीनिमित्त स्वदेशी व प्लास्टिक मुक्तीचा नारा देत आकर्षक रंगीबेरंगी कागदाचे पर्यावरणपूरक आकाश कंदील तयार केले. या दिवाळीत चायनाचे आकाश कंदील न वापरता स्वत: तयार केलेले आकाश कंदील, पणत्या वापरण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.कार्यानुभव कार्यशाळेतंर्गत विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी आकाश कंदील बनवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात सर्व शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सुंदर व कल्पकतेने, वेगवेगळ्या टाकाऊ वस्तूंचा व क्राफ्ट पेपरचा वापर करून विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक आकाश कंदील बनवले. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.



नगर शहरातील ल. भा. पाटील प्राथमिक विद्यालयात दिवाळीनिमित्त आयोजित आकाश कंदिल व पणत्या बनवा उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी.

## शहरातील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालयाचा उपक्रम

प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवाजीराव लंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. माध्यमिकच्या प्राचार्य छाया काकडे यांनी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर चिमुकल्या विद्यार्थ्यांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमासाठी विभागप्रमुख सुजाता दोमल यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते. या कार्यशाळेत मिरी हायस्कूलचे कला शिक्षक संतोष कदम व शिक्षिका शिल्पा कानडे यांनी विद्यार्थ्यांना आकाश कंदिल बनविण्याचे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. उपस्थित शिक्षकांनी एकत्रितपणे भव्य आकाश कंदिल साकारले. हे आकाश कंदिल शाळेच्या प्रांगणात लावण्यात आले.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी उर्मिला साळुंखे, मीनाक्षी खोडदे, शितल रोहोकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, भाग्यश्री लोंढे, रूपाली जाधव, पुनम घाडगे, इंदुमती दरेकर, रूपाली पांडुळे यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावा व त्यांनी बनवलेल्या वस्तूंपासून दिवाळी साजरा करण्याचा आनंद मिळण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाला घातक ठरणारे प्लास्टिकचे आकाश कंदीलवर पर्याय म्हणून विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेले आकाश कंदील त्यांच्या घरावर दिसणार असून, एकप्रकारे स्वदेशी वस्तूंचा चालना देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला आहे, असे शिवाजीराव लंके (मुख्याध्यापक, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय) म्हणाले.

# शिक्षणच विद्यार्थ्यांची दुर्बलता दूर करेल

## आबीद खान यांचे प्रतिपादन; मख़दुम सोसायटी तर्फे स्वतंत्रता सेनानी सरसैय्यद अहमद खान यांच्या जयंतीनिमित्त बाल साहित्याची पुस्तके वाटप

नगर – आज समाजामध्ये शिक्षणाची दोन भागात विभागणी झाली आहे. एक म्हणजे शासकीय शाळेतील शिक्षण व दुसरे खाजगी शाळेतील शिक्षण. या पद्धतीमुळेच समाजात गरीब व श्रीमंत असे दोन गट निर्माण झाले आहे. दोन्हीकडे शिक्षणाचे तेच धडे आहे, पण सुविधांचा व अनुशासनाचा फरक आहे. शासकीय शाळामध्ये सुविधा व अनुशासनाचा अभाव असल्यामुळे ते खासगी शाळांच्या स्पर्धेत मागे पडत आहे. अशावेळी शासकीय शाळेतील विद्यार्थ्यांना चांगले व दर्जेदार शिक्षण दिल्यास ते जीवनात यशस्वी होतील आणि हेच शिक्षण त्या विद्यार्थ्यांची दुर्बलता दूर करेल, असे प्रतिपादन मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान खान यांनी केले.



मखदुम सोसायटीतर्फे स्वा.सै. सरसैय्यद अहमदखान यांच्या जयंतीस विद्यार्थ्यांना बालसाहित्याचे वाटप प्रसंगी अध्यक्ष आबिद दुल्हेखान, डॉ. रिजवान शब्बीर, मुख्याध्यापिका शेख यास्मिन अब्दुल सलिम आदी.

मख़दुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्यावतीने स्वतंत्रता सेनानी सरसैय्यद अहमद खान यांच्या जयंतीनिमित्त दर्गादायरा येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना डॉ. रिजवान शब्बीर यांच्या वतीने बाल साहित्याची पुस्तके मोफत वाटप आबीद खान यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापिका शेख यास्मिन अब्दुल अलीम, शेख ताहेरा शिरीन मो. हुसेन, शेख नसीम मो. इब्राहिम, शेख शाकेरा अजीज, शेख नाजनीन, अजीज आदिंसह शिक्षकवृंद उपस्थित होते. मिळालेल्या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. सूत्रसंचालन शेख शाकेरा यांनी केले. आभार शेख ताहेरा यांनी मानले.



व्यक्तीच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपणाची मोहिम चालवणारे चर्मकार विकास संघाचे युवा शहर जिल्हाध्यक्ष निलेश आंबेडकर यांच्या निधनानंतर वृक्षारोपण करुन त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. वडगाव गुप्ता येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सोमा काते, आकाश देशमुख, जनार्दन उदमले, भाऊसाहेब आंबेडकर, सुभाष चिंधे, श्यामराव पिंपळे, वडगाव गुप्ताचे सरपंच सोनूबाई शेवाळे, उपसरपंच विजय शेवाळे, ग्रामपंचायत सदस्या सुवर्णा आंबेडकर, बाबासाहेब आंबेडकर, किरण सोनवणे, दिलीप आंबेडकर, भाग्यश्री आंबेडकर, अशोक आंबेडकर, बबन आंबेडकर, प्रतिभा आंबेडकर, सुवर्णा आंबेडकर, अर्चना आंबेडकर, नामदेव आंबेडकर, चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, भाऊसाहेब गोरे, अनिल गोरे, जनार्दन साळे, संगीता देशमुख आदी.




आय.एम.एस. संस्थेमध्ये एम.बी.ए.च्या पालक-शिक्षक मेळाव्याप्रसंगी संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता, डॉ. प्रणोती तेलोरे व उपस्थित पालक-शिक्षक.

# आयएमएसमध्ये एम.बी.ए.चा पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

नगर – आयएमएस संस्थेतील एम.बी.ए. विभागाचा पालक शिक्षक मेळावा शुक्रवारी उत्साहात झाला. पालक शिक्षक मेळावासहसा शालेय स्तरावर घेतला जाणारा कार्यक्रम आहे. परंतु मागील अनेक वर्षांपासून इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करीयर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च म्हणजेच आय.एम.एस. हा कार्यक्रम यशस्वीरित्या घेऊन पालकांशी संवाद साधते.

या मेळाव्यात शंभराहून अधिक पालकांनी उत्साहात हजेरी लावली. यावेळी संस्थेचे संचालक डॉ.एम.बी.मेहता यांनी सर्वांचे स्वागत केले व भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीचा वारसा लाभलेल्या आयएमएस संस्थेविषयी माहिती दिली.

व्यवस्थापन विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. प्रोनोती तेलोरे यांनी विभागातील शिस्त, वर्तणुक तसेच पालकांकडुन अपेक्षा याविषयी माहिती दिली. वर्गशिक्षक प्रा. सय्यद मुदस्सर यांनी विभागातील विविध उपक्रम आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच प्लेसमेंट ऑफिसर सुरेश खन्ना यांनी प्लेसमेंट संदर्भात माहिती दिली.

औपचारिक कार्यक्रमानंतर पालकांचे गट निर्माण करुन विभागातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापिकांनी त्यांच्याशी हितगुज साधुन शंकानिरसन केले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी डॉ.ऋचा तांदूळवाडकर, डॉ.मनोज कुलकर्णी, प्रा.अश्विनी थोरात, डॉ.राहुल खंडेलवाल, डॉ.हर्षवर्धन भावसार, प्रा.विजय शिंदे, प्रा.साक्षी मध्यान, प्रा.पूनम तिवारी उपस्थित होते. मेळाव्याचे समन्वयक म्हणून डॉ. हातीम कय्युमी यांनी काम पाहिले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण व्यवस्थापन विभागाचे परिश्रम घेतले.

# घर घर लंगर सेवेच्यावतीने धनेश बोगावत यांचा गौरव

## सेवा कार्यातील योगदान व नवोदित कलावंतांना प्रोत्साहन देण्याच्या कार्याचा सन्मान

नगर – कोरोना महामारीच्या पहिल्या लाटेपासून शहरात सुरु झालेल्या घर घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयाला सातत्याने मदत करणारे व शहरातील नवोदित कलाकारांसाठी व्यासपीठ निर्माण करुन देण्याच्या उद्देशाने योगदान देणारे धनेश बोगावत यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

शहरातील स्विट होम मध्ये बोगावत यांचा जनक आहुजा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, रवी बक्षी, डॉ. संजय असणानी आदींसह घर घर लंगर सेवेचे सेवादार उपस्थित होते.



सेवाकार्यातील योगदान व नवोदित कलावंतांना प्रोत्साहन देण्याच्या कार्याचा घर घर लंगर सेवेतर्फे धनेश बोगावत यांचा सत्कार करताना जनक आहुजा आदी.

जनक आहुजा म्हणाले की, घर घर लंगर सेवेच्या अन्न दानामध्ये अनेक सेवादारांचे हातभार लागले असून, आजही ही सेवा गरजूंसाठी सुरु आहे. या माणुसकीच्या भावनेने धनेश बोगावत यांनी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

हरजितसिंह वधवा म्हणाले की, शहराच्या सांस्कृतिक चळवळीला नेहमीच बोगावत यांनी पाठबळ दिले आहे. त्यांचे वडिल छगन बोगावत हे एक उत्तम कलाकार व संगीतप्रेमी होते. त्यांचा वारसा पुढे घेऊन जाण्याचे काम धनेश बोगावत करत आहे. नवोदित कलाकारांना त्यांनी दिलेले पाठबळ दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना धनेश बोगावत म्हणाले की, घर घर लंगर सेवेच्या वतीने कोरोनाच्या टाळेबंदीपासून शहरातील लाखो गरजू घटकांना दोन वेळचे अन्न देऊन त्यांची भूक भागविली. लंगर सेवेच्या अन्न छत्रालयात अवघ्या १० रुपयात एका व्यक्तीला पोटभर जेवणाचे फुड पॅकेट दिले जात आहेत. मागील चार वर्षापासून शहरात लंगरची सेवा अवितरत सुरु आहे. या सेवा कार्यात बोगावत परिवाराने खारीचा वाटा उचलला असल्याचे त्यांनी सांगितले. तर हा सत्कार नेहमीच सेवा कार्य करण्यास बळ देणार असल्याची भूमिका स्पष्ट केली.



शहरातील यतीम खाण्यातील अनाथ विद्यार्थ्यांन भोजन देऊन संस्थेस चटाया व दस्तरखान वाटप करण्यात आले. यावेळी दत्ता तापकिरे, पै.दिशान शेख, फरान शेख, कावीश वस्ताद, वसीम शेख, वाहिद शेख, अझर शेख, फैरोज कुरेशी, वसीम बिल्डर, सतीश सातपुते, समीर मेंबर, नइम सरकार आदीसह मित्रपरिवार.

# अपहरणाच्या गुन्ह्यातून माजी नगरसेवक स्वप्निल शिंदे व शाहरुख शेख निर्दोष

नगर – अपहरण व खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी कर्नाटकमध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यात शहरातील पाच जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. नुकतेच कुलबुर्गी न्यायालयाने आदेश दिले आहेत. दोन वर्षापूर्वी अपहरण व खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी माजी नगरसेवक स्वप्निल शिंदे, विकी उर्फ विकास खरात, शाहरुख शेख, अभिजीत कुलाख व अक्षय इकडे या पाच जणांवर शहाबाद (जि. कुलबुर्गी, कर्नाटक) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

याप्रकरणी पोलीसांनी दोषारोपत्र दाखल करुन, या खटल्याची सुनावणी कुलबुर्गी न्यायालयात झाली. त्यावर न्यायालयाने नगरच्या पाच आरोपींची सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले.

# अर्थजगत

*दसरा संपला की सर्व कर्मचाऱ्यांना बोनसचे वेध लागतात. हा बोनस साधारणपणे नियमित वेतनाच्या दीडपट असतो. उदा. ५० हजार वेतन असेल तर साधारणपणे ७५ हजारापर्यंत बोनस असू शकतो. अर्थात बोनसच्या रक्कमेचे निकष हे कंपनीनिहाय आणि संस्थेनिहाय वेगवेगळे असू शकतात. काही ठिकाणी मूळ वेतनाच्या २०–३० टक्केच बोनस देतात. असो, नियमित वेतनाव्यतिरिक्त मिळणारी रक्कम मोठा आर्थिक आधार ठरते. बोनसचे पैसे वर्षभरातील कठोर मेहनतीनंतर मिळतात. त्यामुळे नेहमीच त्याचा विनियोग सांभाळून करणे गरजेचे आहे. दिवाळीपूर्वी मिळणारा पैसा हा लहानमोठी खरेदीसाठी उपयुक्त मानला जातो. बहुतांश मंडळी बोनसरुपाने मिळालेल्या पैशाची गुंतवणूक करत नाहीत. मात्र ही कृती योग्य नाही. तज्ज्ञांच्या मते, बोनसचा पैसा हा खर्च करण्याबरोबरच गुंतवणूक वाढवण्यासाठी देखील करायला हवा.*

## कसा खर्च कराल बोनस?



**आर्थिक पोर्टफोलिओचा विस्तार करा**

बोनसच्या रुपाने मिळालेली रक्कम आर्थिक स्थिती आणखी मजबूत करण्यासाठी वापरु शकतो. आपण इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये दीर्घकाळासाठी गुंतवणूक करुन दरवर्षी दहा ते पंधरा टक्के परतावा मिळवू शकता. याप्रमाणे डेट म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक केल्यास ८ ते १२ टक्के परतावा मिळू शकतो. आपल्या मुलीच्या नावाने सुकन्या समृद्धी योजना किंवा मुदत ठेवीत त्याचा वापर करु शकतो. तसेच आरोग्य विम्यासाठी देखील या पैशाचा वापर करता येतो.

**आपत्कालिन निधी उभारा**

नोकरदार वर्गासाठी आपत्कालिन निधी असणे खूपच आवश्यक आहे. जर आपण आतापर्यंत इमरजन्सी फंड केला नसेल तर बोनसच्या पैशाची मदत घेऊ शकता. जर अगोदरपासूनच इमरजन्सी फंड असेल तर त्यात आपण वाढ करु शकतो. या फंडमध्ये किमान सहा महिन्याच्या उत्पन्नाएवढा निधी असणे गरजेचे आहे. यात आपल्याला कर्जाचा हप्ता, दररोजचा खर्च, शाळेची फिस, विमा हप्ता, अन्य खर्चाचा विचार करावा लागेल.

**खर्चापूर्वी यादी तयार करा**

बोनसच्या रुपाने गरजेचे सामान खरेदी करणे शहाणपणाचे लक्षण ठरेल. दिवाळीच्या खरेदीअगोदर आवश्यक सामानाची यादी तयार करा. त्यानंतर खरेदीची निश्चिती करा. अशा स्थितीत आपल्याला क्रेडिट कार्ड किंवा पर्सनल लोन घेण्याची गरज भासणार नाही.

■ सल्ला मोलाचा

**बिल आणि कर्जाची परतफेड करणे**

जर आपण क्रेडिट कार्डचा वापर करत असाल आणि बिल पेंडिग असेल तर बोनसच्या रुपातून मिळालेला पैसा क्रेडिट कार्डचे बिल भरण्यासाठी वापरावे. पर्सनल लोन असेल तर बोनसच्या पैशातून ते लोन संपवू शकता. कर्ज जेवढे कमी असेल त्याप्रमाणात आपली आर्थिक स्थिती चांगली राहते. उदा. जर आपल्याला ५० हजार रुपये बोनस मिळत असेल तर त्यापैकी दहा ते पंधरा हजार गुंतवणूक किंवा अन्य गरजेच्या बाबींसाठी खर्च करावेत. उर्वरित तीस ते ३५ हजार रक्कम दिवाळीतील खरेदीसाठी खर्च करावे. यात महिन्याच्या किराणा सामानाचाही समावेश करावा. जेणेकरून पुढील महिन्यात आर्थिक ताण राहणार नाही. आजकाल मॉलमध्ये किराणा सामनावर मोठ्या प्रमाणात सवलत दिली जाते. खराब न होणार्या वस्तूंची खरेदी करुन अधिक लाभ मिळवण्याचा विचार करावा.

### काय करावे?

- ▶बोनसच्या ७० ते ८० टक्के रक्कम ही गुंतवणूक वाढविण्यासाठी करावी. दीर्घकाळासाठी गुंतवणुकीचा विचार करावा.
- ▶वीस ते ३० टक्क्यांपेक्षा कमी रक्कमेची खरेदी करणे हे हिताचा निर्णय ठरेल.
- ▶इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करावा. दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत परतावा मिळवू शकतो. एसआयपीच्या माध्यमातूनही गुंतवणूक सुरू करता येईल.
- ▶यावर्षी सोन्यात गुंतवणूक करणे काहीसे जोखमीचे ठरू शकते. कारण भाव ऐतिहासिक उच्चांकावर आहेत. अशा वेळी गोल्ड इटीएफचा विचार करता येईल.
- ▶आपले पीपीएफ खाते असेल तर काही रक्कम त्यात टाकण्याबाबतही सकारात्मक असायला हवे. याशिवाय लहान रक्कमेची एक वर्षाची मुदत ठेव करायला हरकत नाही. पुढील दिवाळीला किंवा आवश्यक खर्चासाठी अतिरिक्त रक्कम म्हणून ती उपयुक्त ठरू शकते. ◆◆◆

## वापरा दोन विमा योजना




■ इन्शुरन्स झोन

वाढत्या आरोग्यसेवेच्या खर्चामुळे, ज्येष्ठ नागरिकांसाठी पुरेसे वैद्यकीय कव्हरेज अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. जसजसे वय वाढते तसतशी आरोग्य समस्यांची शक्यता देखील वाढते. यामुळे आरोग्य विम्याचे महत्त्व अधिक वाढत चालले आहे. आता ज्येष्ठ नागरिक खाजगी विमा आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनाचा लाभ घेऊन त्यांची सुरक्षा वाढवू शकतात. या दोन योजना एकत्र करून, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत ते आर्थिक भार टाळू शकतात.

आयुष्मान भारत – प्रधान मंत्री जन आरोग्य योजना ही भारत सरकारची एक प्रमुख आरोग्य विमा योजना आहे, ज्याचा उद्देश ज्येष्ठ नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आहे. अलीकडे, ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश करण्यासाठी या योजनेचा विस्तार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना सरकारी आणि नोंदणीकृत खासगी रुग्णालयात ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतात.

याव्यतिरिक्त, त्यांच्याकडे खाजगी विमा देखील असल्यास, ते दोन्ही योजना एकत्र करून त्यांचे वैद्यकीय संरक्षण आणखी वाढवू शकतात. सरकारने असेही स्पष्ट केले आहे की आयुष्मान भारत योजनेंतर्गत ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना ५ लाख रुपयांचे अतिरिक्त टॉप–अप कव्हरेज मिळेल. याचा अर्थ कुटुंबातील सदस्य हे कव्हरेज त्यांच्या वरिष्ठ सदस्यांमध्ये सामायिक करू शकतात.

अनेक ज्येष्ठ नागरिकांकडे आधीच खाजगी आरोग्य विमा पॉलिसी आहेत, ज्या त्यांनी वर्षानुवर्षे सांभाळल्या आहेत. या खाजगी विम्यासोबत आयुष्मान भारत योजना जोडण्यावर कोणतेही बंधन नाही. याचा अर्थ ज्येष्ठ नागरिक त्यांचा खाजगी विमा प्राथमिक कव्हरेज म्हणून वापरू शकतात आणि अतिरिक्त खर्चासाठी आयुष्मान भारत योजनेचा लाभ घेऊ शकतात. हे संयोजन एक मजबूत सुरक्षा कवच तयार करेल. यातून वैद्यकीय बिले भरण्यासाठी अनेक स्त्रोतांकडून निधी मिळवता येतो.

**योग्य कव्हरेज मिळण्यासाठी**

**तुमच्या गरजांचे मूल्यांकन करा:** प्रथम तुमचे आरोग्य, कौटुंबिक इतिहास आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विमा निवडा.

**आयुष्मान भारत पात्रता तपासा :** जर तुम्ही आयुष्मान भारतसाठी पात्र असाल, तर हे तुमचे बेस कव्हरेज म्हणून वापरा.

**योग्य खाजगी विमा निवडा:** आयुष्मान भारत द्वारे कव्हर केलेल्या क्षेत्रांव्यतिरिक्त इतर क्षेत्रांचा समावेश करणारी पॉलिसी मिळवा.

**टॉप–अप योजनांचा लाभ घ्या:** या योजना अतिरिक्त कव्हरेज देतात आणि कमी प्रीमियम देखील आहेत.

**गंभीर आजारांसाठी संरक्षण मिळवा:** गंभीर आजारांसाठी स्वतंत्र पॉलिसी मिळवा, जी निदानावर एकरकमी रक्कम देते आणि उपचार खर्च व्यवस्थापित करण्यात मदत करते.

या योजना आणि योग्य विमा निवडून ज्येष्ठ नागरिक त्यांची आरोग्य सुरक्षा सुधारू शकतात आणि वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत आर्थिक भार टाळू शकतात. ◆◆◆

## गृहकर्ज घेण्यासाठीचा ‘खर्च’

■ बँकिंग विशेष



घर खरेदीचा विषय निघतो तेव्हा अनेकांना गृहकर्जाचीच गरज भासते. वास्तविक गृहकर्जाच्या मदतीने घर घेण्याचा निर्णय योग्य मानला जातो.कारण यावरचा व्याजदर कमी असतो. अर्थात कोणतेही कर्ज घेताना त्याचा व्याजदर पाहिला जातो. परंतु त्यावर अनेक प्रकारचे शुल्क आकारले जातात अणि त्याकडे लोकांचे फारसे लक्ष जात नाही. गृहकर्जाचा विचार करता अनेक प्रकारचे शुल्क आकारले जातात. म्हणूनच गृहकर्जाची फाइल मंजूर होताना कोणकोणते शुल्क वसूल केले जातात, ते पाहू.

**अर्जासाठी शुल्क :** अनेक बँकांकडून कर्जासाठीच्या अर्जासाठी शुल्क वसूल केले जाते. यास काही बँका लॉगिन चार्ज असेही म्हणतात. हे शुल्क अडीच हजार ते साडे सहा हजारपर्यंत राहू शकते. बहुतांश बँका कर्ज मंजुर केल्यानंतर हे शुल्क प्रक्रिया शुल्काला जोडून घेतात. त्याचवेळी कर्ज मंजूर झाले नाही तर ते शुल्क परत मिळेलच याची खात्री नसते.

**प्रक्रिया शुल्काची आकारणी :** प्रत्येक बँक मग कर्ज कोणत्याही प्रकारचे असो त्यावर प्रक्रिया शुल्क आकारते. गृहकर्जावर देखील शुल्क वसुली केली जाते. कर्जाच्या रक्कमेवर प्रक्रिया शुल्काची रक्कम ठरलेली असते. कर्जाची फाईल मंजूर करताना त्यांना येणाऱ्या खर्चाची वसुली ही प्रकिया शुल्काच्या माध्यमातून केली जात असल्याचे बँकेकडून सांगितले जाते. अर्थात सणासुदीच्या काळात काही बँका शून्य प्रकिया शुल्कची सवलत देतात.

**मुदतपूर्व बंद केल्यास शुल्क :** अनेकदा लोकांकडे वेळेच्या अगोदरच पैसे येतात. अशावेळी गृहकर्जाची फाईल लवकर बंद करावी, असा ते विचार करत असतात. कारण त्यावर व्याजापोटी बरीच रक्कम मोजावी लागत असते. त्यांना दर महिन्यांना हप्त्याचा ताण असतो. अशावेळी गृहकर्ज मुदतीच्या अगोदर ते बंद करण्याचा पर्याय असू शकतो. परंतु त्यासाठी दोन ते सहा टक्क्यांपर्यंत फोरक्लोजर चार्ज भरावा लागतो आणि तो चार्ज शिल्लक रक्कमेनुसार आकारला जातो.

**स्विचिंग चार्ज जाणून घ्या :** आपण फ्लोटिंग रेट कर्जाला फिक्स्ड रेट लोनमध्ये किंवा फिक्स्ड रेट लोनला फ्लोटिंग रेट लोनवर रुपांतरित करू इच्छित असाल तर बँक या बदलापोटी शुल्क घेऊ शकते. त्याला स्विचिंग चार्ज असे म्हटले जाते. साधारणपणे शिल्लक रक्कमेवर ०.२५ टक्के ते तीन टक्क्यांपर्यंत हे शुल्क आकारले जाते. बहुतांश मंडळी फ्लोटिंग रेटवरच कर्ज घेतात. परंतु काही बँका फिक्स्ड रेटवर देखील गृहकर्जाची ऑफर देतात.

**रिकव्हरी चार्ज :** गृहकर्जाची रक्कम वेळेवर न भरल्यास बँकेकडून त्यांना डिफॉल्टर म्हणून जाहीर करत त्यांच्याविरुद्ध कारवाई करते. अशावेळी ग्राहकांकडून पैशाची वसूली केली जाते. या प्रक्रियेत बँकेला येणाऱ्या खर्चाची भरपाई ही संबंधित ग्राहकांकडून रिकव्हरी चार्जच्या रुपातून करते.

**निरीक्षण शुल्क :** ज्या मालमत्तेसाठी तुम्ही गृहकर्ज घेत असाल त्याच्या किंमतीचे आकलन करण्यासाठी बँकांचे तज्ज्ञांचे पथक प्रकल्पाच्या ठिकाणी जाते. कायदेशीर मान्यता, लेआऊट मंजुरी, बिल्डिंग स्पेसिफिकेशन, बांधकामाचे निकष आदी गोष्टींचे आकलन करत इमारतीचे मूल्यांकन केले जाते. या निरीक्षसाठी बँक ग्राहकांकडून शुल्क वसूल करते. अनेक बँकांकडून हे शुल्क प्रक्रिया शुक्लात सामील केले जाते तर काही जण स्वतंत्रपणे वसूल करतात.

**लीगल फीस (कायदेशीर शुल्क):** खरेदी केल्या जाणाऱ्या मालमत्तेत काही कायदेशीर अडचणी तर नाही ना, हे तपासणीसाठी बँकेकडून कायदेशीर पथक नेमले जाते. हे पथक टायटल डीड, प्रॉपर्टी ओनरशिपची माहिती, डिप्रिसिएशन, एनओसी, ऑक्यूपन्सी प्रमाणपत्र आदींची तपासणी करते. चौकशीनंतर हे पथक बँकेला कर्ज मंजूर करायचे की नाही हे सांगते. या सेवेच्या बदल्यात तज्ज्ञांना शुल्क दिले जाते व त्यास लीगल फिस म्हटले जाते. ही फीस बँक आपल्या गृहकर्जावरही लागू करते.

– **नीलेश पुजारी**, करसल्लागार ◆◆◆

## उसळी टिकणार का?



■ वेध बाजाराचा

ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांमध्ये नवनवी उच्चांकी शिखरे गाठणाऱ्या आणि सार्वकालिक विक्रम प्रस्थापित करणाऱ्या भारतीय शेअर बाजारासाठी ऑक्टोबर महिना हा निराशाजनक ठरला आहे. ऑक्टोबरच्या पूर्वार्धात सलग दोन आठवडे बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली होती. गेल्या आठवड्यातही मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्समध्ये ४.५३ टक्क्यांची भरभक्कम घसरण झाली आणि तो ८१२२४.७५ अंकांवर बंद झाला; तर निफ्टी५० मध्येही ४.४४ टक्क्यांची म्हणजेच ११६४.३५ अंकांची घसरण होऊन २४८५४.०५ अंकांवर बंद झाला. या घसरणीचे एक कारण म्हणजे इस्राईल विरुद्ध हमास–हिजबुल्लाह–इराण यांच्यातील संघर्ष चिघळण्याच्या शक्यता वाढत चालल्या आहेत. दुसरीकडे देशांतर्गत पातळीवर जाहीर होणाऱ्या प्रमुख कंपन्यांच्या तिमाही निकालांनी अपेक्षेप्रमाणे नफावृद्धी दर्शवलेली नाहीये. तिसरे कारण म्हणजे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून भरभक्कम विक्रीचा मारा सलग तिसऱ्या आठवड्यातही कायम आहे. गतसप्ताहात एफआयआयकडून २१८२३.३४ कोटी रुपयांच्या समभागांची विक्री करण्यात आली आहे; तर डीआयआयकडून १६३८४ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी करण्यात आली आहे. ऑक्टोबर महिन्यातील आकेवारी पाहिल्यास आतापर्यंत एफआयआयकडून तब्बल ८०,२१७.९० कोटी रुपयांच्या समभागांची विक्री करण्यात आली असून डीआयआयकडून ७४१७६.२० कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी करण्यात आली आहे.

गतसप्ताहात भारतीय बाजारात पहिले तीन दिवस घसरण दिसून आली असली तरी गुरुवार–शुक्रवारी तेजीची हिरवळ पाहायला मिळाली. शुक्रवारच्या एकाच सत्रात निफ्टीत १०४ अंकांची; तर सेन्सेक्समध्ये २१८ अंकांची वाढ झाली. बँकनिफ्टीसाठी शुक्रवार आश्वासक ठरला आणि या दिवशी ८०५ अंकांची वाढ या निर्देशांकाने नोंदवली आहे. शुक्रवारच्या दिवशी अमेरिकन बाजारातही घसरण झालेली नसली तरी फार मोठी तेजी दिसून आलेली नाही. नॅसडॅकमध्ये ११८ अंकांची वाढ झाली आहे.

या पार्श्वभूमीवर चालू आठवड्यात भारतीय शेअर बाजाराची वाटचाल कशी असेल, याचा विचार करता काही प्रमुख बाबी लक्षात घ्यायला हव्यात.

सर्वांत आधी शुक्रवारचे सत्र संपल्यानंतर जाहीर झालेल्या एचडीएफसी बँक आणि कोटक महिंद्रा बँक या दोन महत्त्वाच्या कंपन्यांकडून जाहीर झालेल्या तिमाही निकालांवर बाजार प्रतिक्रिया देताना दिसेल. एचडीएफसी बँकेचा सप्टेंबर तिमाहीत एकत्रित निव्वळ नफा सहा टक्क्यांनी वाढून १७,८२५.९१ कोटी रुपये झाला आहे; तर वाढून रु. १६,८२०.९७ कोटी झाला आहे. मागील वर्षीच्या याच कालावधीत तो रु. १५,९७६.११ कोटी होता. कोटक महिंद्रा बँकेच्या सप्टेंबर तिमाहीच्या नफ्यात १३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. बँकेचा एकत्रित नफा ५,०४४ कोटी रुपये झाला आहे. त्यामुळे या समभागांवर निकालांचे परिणाम दिसतील.

याखेरीज चालू आठवड्यात आयटीसी, हिंदुस्तान युनिलिव्हर, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., अल्ट्राटेक सिमेंट, बजाज हाऊसिंग फायनान्स, अदानी ग्रीन एनर्जी, बजाज फायनान्स, वन९७ कम्युनिकेशन्स, झोमॅटो, बजाज फिनसर्व्ह आणि बँक ऑफ बडोदा यांचे तिमाही निकाल जाहीर होणार आहेत. निकालांमुळे हे समभागही प्रभावित होताना दिसतील.

भारतीय बाजारातील समभागांचे उच्च मूल्यांकन आणि चीनी समभागांचे स्वस्त मूल्यांकन यामुळे एफआयआयकडून विक्रीचा मारा अव्याहत सुरु आहे. भू–राजकीय अनिश्चितता, चिनी अर्थव्यवस्थेतील मंदी आणि देशांतर्गत बाजारातून एफआयआयची सततची माघार यामुळे गुंतवणूकदार सावध भूमिकेत आहेत. आखातातील युद्धात हिजबुल्लाहने थेट इस्राईलचे राष्ट्राध्यक्ष बेंजामिन नेतन्याहू यांच्या घराजवळ ड्रोन हल्ला केल्याने हे युद्ध चिघळण्याची शक्यता आहे. त्याचा बाजारावर काय पणिाम होतो हे पहावे लागेल.

दुसरीकडे काही जमेच्या बाजूही आहेत. एक म्हणजे कच्च्या तेलाचे भाव ७३ डॉलर्सपर्यंत घसरले आहेत. आयटी क्षेत्रात कर्मचारीकपात मागे सरुन नवी भरती सुरू झाली आहे. त्यामुळे चालू आठवड्यात आयटी क्षेत्रातील समभागात तेजी दिसू शकते. वर्षातील सर्वांत मोठा सण दाराशी आला आहे. अशा स्थितीत बाजार पुन्हा उसळी घेण्याच्या तयारीत असल्याचे संकेत शुक्रवारच्या तेजीने दिले आहेत. विशेषतः बँकिंग क्षेत्रातील समभागांत तेजी दिसू शकते.

निफ्टी आणि बँक निफ्टी या दोन्ही निर्देशांकांनी ऑक्टोबर महिन्यातील नीचांकी पातळीवरुन नवी उसळी घेतली आहे. मिडकॅप, स्मॉलकॅप समभागांतही चांगली रिकव्हरी दिसून आली आहे. निफ्टीसाठी २४९५०–२५००० या पातळीवर अडथळा आहे. त्यामुळे २५ हजारांच्या पातळीच्या वर स्थिरावल्याशिवाय नवी तेजी दिसणार नाही.

चालू आठवड्यात समभागांचा विचार करता आयटी, बँकिंग क्षेत्र, निवडक केमिकल कंपन्यांचे समभाग आणि फार्मा कंपन्यांचे समभाग यांमध्ये खरेदीची संधी साधता येईल. आयसीआयसीआय बँकेचा समभाग १३०० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल; तर बॉम्बे डाईंगचा समभाग २६५ रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. इन्फोसिसचा समभाग १८५० च्या पातळीवर खरेदी करुन २२०० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल. याखेरीज हॅवेल्स, एलअँड टी टेक यांसारख्या समभागातही खरेदीची संधी साधता येईल. आगामी सणासुदीच्या हंगामाचा विचार करता तेजी दिसणार का हे पाहणे औचित्याचे ठरेल. ◆◆◆

## एसआयपी करा; पण..




■ राधिका बिवलकर

जेव्हा बचत आणि गुंतवणुकीचा विचार येतो तेव्हा बहुतांश नागरिकांचा ओढा हा बँकेतील मुदत ठेवी, सोने किंवा रिअल इस्टेटकडे असतो. सोने, रिअल इस्टेट, मुदत ठेवी या मालमत्तेविषयी खात्रीशीर गुंतवणूक असून ते आपल्या पैशात वाढ करतात. या पैशाच्या तुलनेत आपल्याला अधिक पटीने वाढ मिळावी अशी सुप्त इच्छा असते. एका अभ्यासातील निष्कर्षानुसार इक्विटी ही दीर्घकाळासाठी मालमत्ता जमवण्यासाठी उत्तम गुंतवणूक योजना म्हणून सिद्ध झाली आहे. यात गुंतवणूक करण्याचे सर्वात चांगले माध्यम म्हणजे म्युच्युअल फंड होय. यात आपण किमान पाचशे रुपयांनी गुंतवणूक सुरू करू शकता. ज्यांना शेअर बाजाराची धास्ती वाटते किंवा जोखीम वाटते, अशा गुंतवणूकदारांनी म्युच्युअल फंडच्या मदतीने इक्विटी क्षेत्रात गुंतवणुकीला सुरवात करावी. यात जोखीम कमी असते आणि बाजारातील चढउतारात बॅलन्स ठेवण्याचे कामही काही फंड करत असतात. म्युच्युअल फंडमध्ये अधिक जोखमीच्या, कमी जोखमीच्या तसेच बॅलन्स, डेट फंडचे प्रकार आहेत. गुंतवणूकदाराने आपली आर्थिक तब्येत पाहूनच योजनेची निवड करणे हिताचे ठरेल. शेअर बाजार किंवा म्युच्युअल फंड म्हणजे धनवृद्धी करणारी जादूची कांडी नाही. इथे गुंतवणूकदारांना कमालीचा संयम बाळगावा लागतो.

**इक्विटीमध्ये गुंतवणूक :** शेअर म्हणजेच इक्विटीमध्ये गुंतवणूक करून कालांतराने चांगला परतावा मिळवू शकता. या फंडमध्ये केवळ एक वर्षात गुंतवणूक करून काहीच फायदा होत नाही. इक्विटी फंडमध्ये गुंतवणूक करण्यासाठी किमान पाच वर्षाचा कालावधी निश्चित करणे गरजेचे आहे. त्यानंतरच चांगला लाभ मिळवू शकता. म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक: म्युच्युअल फंडमध्ये एकाचवेळी एक लाख रुपये गुंतवावेत असे नाही. त्याचबरोबर शेअर बाजारातील घसरणीची देखील आपण वाट पाहण्याची गरज नाही. म्युच्युअल फंडच्या एसआयपी म्हणजेच सिस्टमॅटिक इन्वेस्टमेंट प्लॅनमध्ये गुंतवणूक करण्यासाठी बाजाराची स्थिती पाहणे किंवा मोठ्या रकमेची वाट पाहणे ही कृती चुकीची ठरू शकते. जर आपण दरमहा किमान पाचशे रुपयाची गुंतवणूक करू शकत असाल तर तातडीने एसआयपी सुरू करावी. गुंतवणूकीची मर्यादा पाच लाख रुपयांपर्यंत गृहित धरून करावी.

**वास्तविक लाभ :** एसआयपी हा म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणुकीचा उत्तम पर्याय होय. एसआयपीच्या माध्यमातून आपण जेवढा पैसा म्युच्युअल फंडमध्ये टाकत राहू, तेवढे यूनिट आपल्याला मिळत राहतात. उदा. आपण गुंतवणूक करत असताना बाजार उंचीवर असेल आणि म्युच्युअल फंडच्या एका यूनिटची किंमत २५ रुपये असेल तर आपल्याला पाचशे रुपयात २० यूनिट मिळतील. जर बाजारात घसरण झाली असेल तर यूनिटचे मूल्य २० रुपये झाले असेल तर आपल्याला २५ यूनिट मिळतील. याप्रमाणे बाजारात तेजी असो वा मंदी आपल्याला कमी जास्त यूनिट मिळत राहतील. घसरणीच्या काळात यूनिट अधिक जमा होतात. त्यामुळे काही मंडळी बाजाराच्या पडत्या काळात अधिकाधिक अतिरिक्त यूनिट खरेदी करण्याबाबत दक्ष असतात.

**फंडची निवड करा:** डायव्हर्सिफाईड इक्विटी फंड किंवा मल्टीकॅप म्युच्युअल फंड सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात प्रचलित आहेत. यापैकी कोणत्या फंडची निवड करावी, असा प्रश्न आपल्यासमोर उभा राहतो. विशेषत: जी मंडळी प्रथमच म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करत असतील त्यांची द्विधा मनस्थिती असते. त्यामुळे म्युच्युअल फंडची निवड करताना त्याची कामगिरी लक्षात घेणे आवश्यक आहे. गेल्या पाच वर्षातील फंडची कामगिरी पाहणे महत्त्वाचे ठरते. चांगला म्युच्युअल फंड हा सरासरी १२ ते १५ टयांपर्यंत परतावा देतो. काही फंड वीस टयांपर्यंत देखील परतावा देतात. म्हणूनच दीर्घकाळ गुंतवणूक केल्या अधिकाधिक परतावा गुंतवणूकदारांना मिळतो. ◆◆◆

# ‘सिद्धार्थ वाणी’

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ उनका चातुर्मास सावेडी मे है।



प्रस्तुत भक्तिस्तोत्रात आचार्यश्रींनी कल्पांतकालापासून श्लोक सुरू करून जग विनाशाचा देखावा मांडला आहे. काळाचे चक्र सतत फिरत असते, चेव्हा अवसर्पिणी काळातील पाचवा आरा संपतो आणि सहावा आरा सुरू होतो तेव्हा वाऱ्याचा प्रचंड प्रवाह विनाशाची अशी भयानक दृश्ये सादर करतो की गावे, शहरे, पर्वतीय नद्या सर्व नष्ट होतात. त्या प्रलयाने बळी ठरलेल्या प्राण्यांचे सामुदायिक पाप उठतात. ज्यामुळे ते एकत्र मरतात, भयंकर आग, आपत्तीमध्ये हवा आणि अग्नि हे दोन मुख्य सहयोगी बनतात. ते प्रचंड रूप धारण करून आपला संतापही व्यक्त करतात एवढा भयंकर प्रलय यावेळी घडत नाही, तर लहान-मोठ्या घटनांमध्ये सजीवांना नंगानाच सहन करावा लागतो. द्वारकेच्या विनाशाचे कारण म्हणजे भीषण आग. श्रीकृष्ण स्वतः परिस्थितीचे जाणकार होते. विश्वात उत्पत्ती आणि विनाशाचा क्रम अनादी काळापासून चालू आहे. म्हणून त्यांनी भगवान नेमिनाथांना विचारले, ‘‘भगवान, द्वारकेच्या नाशाचे कारण काय असेल?’’ तेव्हा भगवान म्हणाले, ‘‘सुर, अग्नि आणि द्विपवंशी ही द्वारकेच्या नाशाची तीन मुख्य कारणे असतील.’’ द्वारकेच्या सुरक्षेसाठी अनेक व्यवस्था करण्यात आल्या होत्या. सहा महिने आयंबिल तपश्चर्या चालली, एके दिवशी कोणत्याही घरात आयंबिल नसल्यामुळे गडवकुमारांच्या दुर्व्यवहारामुळे अग्निकुमार देव बनलेल्या द्वैपायन ऋषींनी भयंकर आगीचा वर्षाव करून सर्वनाश केला. फक्त कृष्ण आणि बलरामच जिवंत राहू शकले. लाखो कुटुंबे त्या आगीत नष्ट झाली. हा मध्यम जगाचा आंशिक विनाश होता. पंचम आरे संपल्यावर संपूर्ण विनाशासारखी परिस्थिती असताना अजूनही मोजकेच माणसे व प्राणी जिवंत आहेत. ते गंगा सिंधू नदीच्या काठावर खड्ड्यांत राहतात. अशा भयंकर आगीत जेव्हा सैन्य, सशस्त्र दल किंवा अग्निशमन यंत्रणाही काम करू शकत नाही, तेव्हा परमेश्वराचा भक्त शांत चित्ताने परमेश्वराच्या नामाच्या कीर्तनाचा प्रवाह वाहतो, ती भीषण आग काही क्षणातच थांबते, शांत होते.

* **भीषण दावानल निवारक संपुट** :- मी जंगलात एकटाच भटकत आहे. जेव्हा जगाचा वारा वाहू लागला आहे, तेव्हा भयंकर आग लागली आहे. त्या भीषण आगीत उड्या मारणाऱ्या ठिणग्या आकाशाला भिडत आहेत. असा सर्वभक्षकपणा आद्रीत समोर शेत आहे, जीव वाचवण्यासाठी वन्य प्राणी सर्वत्र धावत आहेत. भक्ताभोवती शांतता पाहून परमेश्वर आश्रय घेतो. भक्त परमेश्वराच्या नावाने पाण्याचा प्रवाह वाहून जंगल शांत करतो. भीषण आग आपोआप शांत होते. देवाच्या नावाचा जप करत पाण्याच्या धारा शिंपडल्या जात आहे. ज्याप्रमाणे चंद्रकांतमणी हातात धरलेला माणूस धगधगत्या ज्वालामधून जातो आणि तरीही तो जळत नाही, त्याचप्रमाणे चंद्रकांतमणी किंवा अग्निशामक यंत्रापेक्षा तुमचे नाव अधिक प्रभावी आहे. आग लगेच विझते, तुझ्या नामाचा जप मुसळधार पावसासारखा बरसत आहे. नात्यांचा लोभ सुद्धा सर्व भस्म करणारा आह आहे. जो आकाशासारखा अगाध आहे. इच्छा आणि तृष्णेच्या ठिणग्या आकाशाला भिडत आहेत. हे आतील जग बाहेरील अग्नीपेक्षा जास्त धोकादायक आहे.

अग्नी माझे शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या गुणांना जळून राख करत आहे. हे प्रभू! ज्ञानाचा अखंड प्रवाह आणि तुमची भक्ती, तपश्चर्याचा त्याग माझ्यातील धगधगत्या अग्नीला शांत करत आहे.

एवढेच वर्णन करताच चाळीसावा कुलुप उघडला.

*** गाथा * (४०)**

**कल्पान्त-काल-पवनोद्धत-वह्नि कल्पम्**
**दावानलं ज्वलित-मुज्ज्वल-मुत्स्फुर्लिंगम् ।**
**विश्वम् जिघत्सुमिव सम्मुख मापतन्तम्**
**त्वत्राग-कीर्तन-जलम् शळमत्यशेषम् - ।।४०।।**

*** अर्थ- ‘सुहानवन’**

भय दूर करणारी अग्नी, प्रलयकाळाच्या भयंकर महावायामुळे पेटलेल्या, धगधगत्या आणि आकाशात उडणाऱ्या आणि संपूर्ण जगाला भस्मसात करायला तयार असलेल्या ठिणग्याही पाण्याच्या रूपाने काही क्षणात शांत होतात. तुमच्या नावाचा म्हणजेच तुमचा भक्त अग्नीच्या भयापासून पूर्णपणे मुक्त राहतो.

### ‘‘नामाचा नागदामी विषय विषहारणी’’

अहो प्रभो! ज्या भक्ताच्या ह्दयात नागदमणी जडीबुटी तुझ्या नामाचे स्मरण करण्याच्या रूपाने विराजमान आहे. तो भयंकर क्रोधित काळा नाग, ज्याचे डोळे क्रोधाच्या तीव्र लालीने भरलेले ओत. ज्याचा कंठ आणि संपूर्ण शरीर कोकिळेच्या गळ्यासारखे निळे आणि भयानक आहे. तो क्रोधित काळा भुजंग आपल्या फणाने वाढवतो आणि दंश करण्यास तयार असतो. तुझा भक्त अशा सापालाही न घाबरता पार करतो. अष्ट भावांचे विवेचन करताना आचार्य श्रींनी भगवंताच्या भक्ताला भयंकर सर्पराजाच्या भयापासून मुक्ती देणारे एक चाळीसावे भक्तिपुष्प भगवंताच्या चरणी अर्पण केले आहे. कोकिळेच्या गळ्याप्रमाणे काळे निळे असलेला, लाल डोळ्यानी क्रोधित झालेला फणा वर करून खाली फेकणारा भक्ताला चावण्यास तयार असलेला भयंकर क्रोधी अहिराज, ते पाहून शांत व वंदनीय बनतो. देवाचा भक्त असे घडते. ज्या भक्ताला नागदमणीची औषधी असते. तो सापाच्या भीतीपासून मुक्त राहतो. रत्न आणि औषधी वनस्पतींचा थेट परिणाम दिसून येतो. ज्याच्याकडे जलकांत रत्न आहे, श्रीपालसारखे समुद्र कितीही खोलवर पडला तरी तो किनाऱ्यावर पोहोचतो. जंगली विद्या जाणणाऱ्याला साप काहीही इजा करू शकत नाही. क्रूर आणि हिंसक प्राणीदेखील शांत राहतात.

मैत्रीचा सरावदेखील धान्यासारखा शिजवावा लागतो. केवळ भांड्यात ठेवून सल्ला वैध ठरत नाही. हे पाणी आणि राख यांच्या मदतीने शिजवले जाते. मैत्रीचा सराव सहानुभूतीच्या आगीत आणि दयाळूपणाच्या पाण्यातच परिपक्व होतो. मैत्रीची भावना जितकी वाढेल तितका त्वेष अस्तित्वात येतो. क्रोधासारखे कोणतेही विष नाही. क्रोध आणि लोभाचे विष हे साप आणि विंचू यांच्या विषापेक्षा वाईट आहे. सापाचे विष एका जन्मातच निघते, पण मध्यत्व मोहाडी अनतनुबंधी कश्याचे विष प्रत्येक जन्मात जन्म घेते. जे संपत्तीचे लोभी साठेबाज आहेत ते पुढच्या जन्मी साप बनून भूमिगत संपत्तीवर गुंडाळून बसतात.

**विष निवारक संपुट** :- अरे नागांचा राजा, तुम्ही माझे मित्र, सहकारी, शुभचिंतकही आहात. मीही अनेक जन्म नागाच्या पोटात घालवले आहेत. हे शरीराला समानार्थी आहे. आत्मा तिन्ही कालखंडात सारखाच आहे. मला आजवर तुझी भीती वाटत होती, पण हा माझा भ्रम आहे. गैरसमज आहे. आता मला खरी समज आली आहे. किंबहुना सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या माणसालाही सापापेक्षाही घातक विषय असते. म्हणून अग्येजी साप म्हणायचा होता! तू सुसंस्कृत नाहीस. तुला शहरात कसं राहायचं तेही कळत नाही. तुला एक गोष्ट विचारू उत्तर दे? मग तू चावायला कधी शिकलास? आणि तुला विष कुठून आलं? होय. नागराज, तू नागकुमार जातीतील धर्मेन्द्र आणि पद्मावती यांचे रूप आहेस. तू भगवान पार्श्वनाथांची अधिष्ठाता आहेस. माझ्याकडे प्रभूचे नाव आहे, आता मात्र तुझी भीती अजिबात वाटत नाही.

विसहार-विस-निन्नम-मंगल-कल्लन-अवस, विशार-फुलिंग-मंत कंति धरेई जो संया मनुओ। तस गह रोग मारा, दुर जरा जंती उवास ।।२।। चित्तर दौरे अंतो, तुझ पणगो वि बहुफळो होई.

*** गाथा * (४१)**

**रक्तेक्षणं समद-कीकिल-कण्ठ-नीलम**
**क्रोधोध्दतं पुणिन-गुत्फण-मापतत्नमा**
**आक्रमति क्रम-युगेन-निरस्त-शंकस**
**त्वभऊामनागदमनी ह्यदि यस्य पुलः ।।४१।।**

*** अर्थ- ***

ज्या माणसाच्या ह्दयात तुझ्या नावाच्या रूपात नागदमणी जडले आहे, लाल डोळे असलेला आणि मद्यधुंद कोकिळेच्या गळ्यासारखा काळा असलेला रागाने हिसका मारणारा आणि फुशारकी मारण्यासाठी उंच उंचवून समोरून येणाऱ्या भयंकर सापालाही पार करतो, त्याला कोणताही संकोच न करता म्हणजेच तुमचा भक्त सापांच्या भीतीपासून मुक्त राहतो.

*** उत्तरायन सूत्र ***

* **एकोणिसाव्या अध्ययनात** मृगापुत्राचे वर्णन आले आहे. एकदा साधूला पाहताच मृग पुत्राला आपल्या मागील जन्मातील श्रमण चरित्र आठवले. त्यांचे मन उदासीन झाले. त्यांनी श्रमण दीक्षा घेण्यासाठी आई-वडिलांकडे परवानगी मागितली. मृग पुत्राने आत्मसंयमाचा अवलंब केला आणि संत जीवनातील ‘२७’ सद्गुण, क्षमा या दहा गुणांनी ओतले गेले.

**- सौ. सविता चोरडिया**

# दिव्यांग मुलांसाठी ‘यहाँ के हम सिकंदर’ बालरंगभूमी परिषदेचा अनोखा उपक्रम

नगर - बालरंगभूमी परिषद मुंबई आयोजित व अहमदनगर शाखा संचलित दिव्यांगांसाठी ‘यहा के हम सिकंदर’ हा उपक्रम २५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०: ३० वाजता माऊली सभागृह येथे अभिनेत्री व बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या अध्यक्षा ॲड.निलमताई शिर्के-सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा केला जाईल, अशी माहिती अहमदनगर शाखेच्या अध्यक्षा सौ. उर्मिला लोटके यांनी दिली.

या कला महोत्सवात दिव्यांग मुलांसाठी एकल तसेच समूह गीतगायन, नृत्यसादरीकरण, वाद्य वादन व विविध कला दर्शन आदी कार्यक्रम सादर होणार आहे. यासाठी जिल्हाभरातून २५० ते ३०० दिव्यांग, विशेष मुले सहभागी होणार आहेत. सहभागी प्रत्येक संघाला सादरीकरणासाठी मानदेय व स्मृतिचिन्ह दिले जाणार आहे.

तसेच दिव्यांग मुलांच्या प्रशिक्षकांचा सत्कार केला जाणार आहे. यावेळी अनाम प्रेम या अंधमुलांच्या काळजीवाहू संस्थेतर्फे गाण्याचा विशेष कार्यक्रम सादर केला जाईल अशी माहिती महोत्सव प्रमुख विराज अडगटाला यांनी दिली.

जल्लोष लोककलेचा या लोककला महोत्सवानंतर लगेच दिव्यांग व विशेष मुलांच्या विविध कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी बालरंगभूमी परिषदेने यहा के हम सिकंदर हा महोत्सव महाराष्ट्रातल्या सगळ्या जिल्ह्यात आयोजित केला जात आहे. त्यास उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने भविष्यात दर वर्षी हा महोत्सव साजरा करण्याची योजना असल्याचे मध्यवर्तीचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी सांगितले.

यावेळी मध्यवर्तीच्या सहकार्यवाह सौ.दीपाली शेळके, कार्यकारणी सदस्य धनंजय जोशी, अनंत जोशी यांसह समाज कल्याण विभागाचे पदाधिकारी, जिल्हाभरातील विविध दिव्यांग शाळांचे मुख्याधापक व शिक्षक वर्ग व पालक उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रसाद भणगे, शैलेश देशमुख, देवीप्रसाद सोहोनी, सागर अलचेट्टी, प्रशांत सूर्यवंशी, अविनाश बोधले, तेजस अतितकर, तेजा पाठक, सुजाता पायमोडे, टीना इंगळे, सोनाली दरेकर, श्रिया देशमुख, सपना साळुंके, ऋतुजा पाठक आदी कार्यशील आहेत. रसिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमास येऊन या विशेष मुलांचा उत्साह द्विगुणित करावा असे आवाहन बालरंगभूमी परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

# अंधांची दिवाळी आनंदी करण्यासाठी दिव्यदृष्टीच्या धडपड्या दिव्यांगाना हवे समाजातील दानशुरांचे बळ

नगर - समाजातील गरीब, गरजू दिव्यांग यांची दिवाळी आनंदी व्हावी म्हणून मागील ५ वर्षांपासून नगर जिल्ह्यातील जाणिवा जागृत असणारे दिव्यांग धडपडत आहेत. आपण ज्या परिस्थितीतून प्रगत झालो, त्या परिस्थितीची आठवण ठेवून दिव्यदृष्टीचे नोकरी करणारे अंध जन सातत्याने नवोपक्रम राबवत आहेत.

यंदाच्या दिवाळीत नगर जिल्ह्यातील अतिशय पीडित अशा अंध प्रवर्गातील दिव्यांग यांना दिवाळी फराळ करण्यासाठी किराणा किट वाटप करण्याचा दिव्यदृष्टीच्या दिव्यांग यांनी ठरविले आहे. उपक्रमाचे हे ५ वे वर्ष आहे. २७ ऑक्टोंबर रोजी नगर येथे नोंदणीकृत अंधांना किट दिले जाणार आहे. या किट वाटप कार्यक्रम मध्ये १०० दिव्यांग यांना किराणा किट वाटप करण्यासाठी दानशुरांच्या मदतीची आवश्यकता आहे.

तरी दात्यांनी दिव्य दृष्टी च्या अंध जन यांना आर्थिक अथवा वस्तुरुप किराणा स्वरुपात मदत करावी असे आवाहन स्वतः अंध असून ही केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागात उच्चाधिकारी असणारे कृष्णा तवले, निलेश शिंदे, सुभाष शिंदे, किरण खेतमालीस, ढवण उम्रेडकर यांनी केले आहे.

### दिव्यदृष्टी अंधांचे कृतिशील पाऊल

नगर, पुणे, मुंबई, सोलापूर येथे सरकारी नोकरी करणारे मूळचे नगर जिल्ह्यातील अंध जन यांनी एकत्र येऊन ५ वर्षांपूर्वी दिव्यदृष्टी या सामाजिक संस्थेची स्थापना केली. स्वतः अंध असतानाही शालेय, महाविद्यालयीन जीवनात समाज, विविध सामाजिक संस्था, दानशूर मंडळी यांनी मदत केल्याने जीवन घडले. अनेक चढ उतार पाहत, ठेचकाळत ज्यांचे जीवन नोकरी आणि आत्मविश्वासाने स्वावलंबी झाले. अशांच्या जाणिवा प्रगल्भ झाल्या.

आपल्या सारखेच अडचणीत असणारे, नोकरी न मिळू शकलेले असंख्य दिव्यांग प्राप्त परिस्थितीतीशी झगडत आहेत. त्या भावा बहिणी यांना सहज मदत व्हावी म्हणून दिव्यदृष्टी संस्था प्रयत्न करीत आहे. यंदाच्या दिवाळीत अशा अंध जन यांना मदत व्हावी म्हणून किराणा किट वाटप केले जाणार आहे.

### अशी मदत देऊ शकता

नगर जिल्ह्यातील ज्या देणगीदार यांना अशा गरजू अंधांना मदत करायची आहे. त्यांनी दिव्यदृष्टी च्या कार्यालयात पुढील किराण्याची वस्तूरूप मदत देऊ शकता. या किट मध्ये पुढील प्रमाणे वस्तू असणार आहेत. साखर, गूळ, रवा, खाद्यतेल, बेसन पीठ, शेंगदाने, मैदा, खोबरा, वनस्पती तूप, पोहे, चुरमुरे, डाळे, मोती साबण आदी विविध जिनसा किराणा मालात असणार आहेत.

एका किटची किमंत १२०० रुपये असून आपण आपल्या यथाशक्ती संस्थेस आर्थिक स्वरुपात मदत देऊ शकता. क्यू आर कोड अथवा थेट धनादेश अथवा ऑनलाईन आपण आर्थिक मदत संस्थेस देऊ शकता. आपण संस्थेस दिलेल्या देणग्या यांना आयकर कलम ८० जी नुसार आयकरात सवलत मिळणार आहे.

या पूर्णतः अथवा अल्पदृष्टी अंध यांना अधिकाधिक मदत केल्याने थेट गरजू दिव्यांग यांना मदत पोहचली जाणार असल्याने किराणा किट मदतीचे आवाहन केल्यावर १० किट ची मदत संस्थेस मिळाली आहे. दानशूर नगरकर यांनी दिव्यदृष्टी संस्थेस मदत करावी. अधिक माहिती साठी ९८५०८८५९४६/ ९४२०१६१९२३ यावर संपर्क करावा.

# मोबाईल शॉपी फोडून ६६ हजारांचा ऐवज लंपास

नगर - चोरट्यांनी एमआयडीसीतील सह्याद्री चौकातील ओम मोबाईल शॉपी फोडून १५ डेमो मोबाईलसह ६६ हजार ४०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. सदरची घटना ८ ऑक्टोबर रोजी रात्री १० ते ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान घडली असून या प्रकरणी शनिवारी (दि.१९) एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

वैभव भाऊसाहेब बोराडे (वय ३६, रा. सम्राटनगर, नवनागापूर) यांनी फिर्याद दिली आहे. बोराडे यांची नागापूर एमआयडीसीच्या सह्याद्री चौकात ओम मोबाईल शॉपी आहे. त्यांनी ८ ऑक्टोबरच्या रात्री १० वाजता मोबाईल शॉपी बंद केली होती. त्यानंतर चोरट्यांनी शॉपीचा लोखंडी ग्रील पत्रा तोडून आत प्रवेश केला. ६६ हजार ४०० रूपये किमतीचे १५ डेमो मोबाईल चोरून नेले. दुसऱ्या दिवशी ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता बोराडे हे शॉपीत आले असता त्यांना चोरी झाल्याचे लक्ष्यात आले. त्यांनी १९ ऑक्टोबर रोजी एमआयडीसी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करत आहेत.

# ‘लिजेंड इन ऑफ्थल्मॉलॉजी’ व लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्डने नेत्रतज्ज्ञ डॉक्टर प्रकाश कांकरिया सन्मानित



नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांना ‘लिजेंड इन ऑफ्थल्मॉलॉजी’ व लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

नगर - महाराष्ट्र राज्य नेत्रतज्ज्ञ संघटनेच्यावतीने सोलापूर येथे नुकत्याच झालेल्या ४४ व्या राज्यस्तरीय अधिवेशनामध्ये ‘लिजेंड इन ऑफ्थल्मॉलॉजी’ (नेत्रशास्त्रातील उत्तुंग व्यक्तीमत्व) व लाईफ टाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड (जीवन गौरव पुरस्कार) अशा दुहेरी पुरस्काराने नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी नगर शहरामध्ये विज्ञानाची प्रगती, नवनवीन तंत्रज्ञान, लेसर नेत्रशस्त्रक्रिया, चष्म्याचा नंबर घालवून हजारो तरूणांना सैन्यात, पोलिस भरती सारख्या संधी प्राप्त करून दिल्या व बर्याचशा गोष्टी भारतात प्रथमच करण्याचा त्यांचा पायंडा हा इतर नेत्रतज्ज्ञांना आदर्श ठरला. स्वत:च्या आई, वडिलांचे नेत्रदान स्वत: करून अंध रूग्णांवरही नेत्ररोपण स्वत:च्या हाताने करणारे ते भारतातीलच नव्हे तर जगातील दुर्मीळ नेत्रतज्ज्ञ ठरले. ते सर्वांचे एक आदर्श आहेत, असे गौरवोद्‌गार याप्रसंगी नेत्रतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष डॉ. संतोष अग्रवाल यांनी काढले.

डॉ. कांकरिया यांनी सर्व स्तरातील अनेक शिबिरे गावा गावांतून तसेच शहरामधून संपूर्ण भारतात आयोजित केली. जास्त नंबरच्या चष्म्यामुळे ज्यांचे विवाह लांबलेले आहेत, अशा युवतींसाठी विवाहदृष्टीभेट योजना आणली. ४० वर्षांच्या कारकिर्दीत जवळजवळ दोन लाखापेक्षाही जास्त दृष्टीदोष नाहीसे केले आहेत. जगात प्रथमच त्यांनी एकाच दिवसात १०० पेक्षा जास्त लॅसिक आपॅरेशन केले असे ५० वेळा करीत जागतिक विक्रमही प्रस्थापित केला याची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस् मध्येही झाली, अशी माहिती त्यांनी दिली.

हा सन्मान डॉ. कांकरिया यांना अखिल भारतीय नेत्रतज्ज्ञ संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. कुरेश मस्कती व लातूरचे नेत्रतज्ज्ञ खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे (मुंबई), डॉ. ए ए देशपांडे (छत्रपती संभाजीनगर), डॉ. उमा प्रधान (सोलापूर), डॉ. रेवणवार उमेश (यवतमाळ), डॉ. सुहास हळदीपूरकर (पनवेल), डॉ. मीना बापये (माजी अध्यक्ष) आदी उपस्थित होते. याप्रसंगी सचिव डॉ. अतुल कढाणे, सायंटीफीक कमिटी चेअरमन डॉ. वर्धमान कांकरिया, खजिनदार डॉ. मंदार परांजपे हे तर नियोजित अध्यक्ष डॉ. शिरीष थोरात, उपाध्यक्ष ठाणेच्या डॉ. अनघा हेरूर, डॉ. शिरीष मदान, डॉ. सुनैना मलिक (छत्रपती संभाजीनगर), डॉ. संतोष भिडे, डॉ. परिक्षित गोगटे (पुणे), प्रो. बोदीत्म मलायुद्दीन हे उपस्थित होते.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी आपले आई वडिल व समाजाचे ऋण मानले व महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेचे आभार मानले.

# शालेय रग्बी स्पर्धेत ‘श्री समर्थ’ चौथ्यांदा विभागीय पातळीवर



जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेमध्ये श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १७ वर्षे मुलींच्या संघाने सलग चौथ्यांदा जिल्हामध्ये प्रथम क्रमांक व संघाची पुणे विभागीय पातळीवर निवड झाल्याबद्दल शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. (छाया - उदय जोशी)

नगर - जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धा जिल्हा क्रिडा संकुल वाडीया पार्क येथे घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सावेडी विभागातील १७ वर्षे मुलींच्या संघाने सलग चौथ्यांदा जिल्हामध्ये प्रथम क्रमांक मिळविला या संघाची पुणे विभागीय पातळीवर निवड झाली आहे.

खेळाडू पुढीलप्रमाणे - कार्तिकी पथवे (कॅप्टन), संस्कृती चंदने (उपकॅप्टन), अनुष्का तापकीर, धनश्री काळे, श्रावणी ससे, श्रध्दा गाडे, स्वामिनी पोरे, श्रावणी ताठे, स्वानंदी कुलकर्णी, मानसी डहाळे, पायल काकडे, आर्या अरणकल्ले आदी खेळाडूंना क्रिडाविभाग प्रमुख पोपट लोंढे यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

यश संपादन करणाऱ्या खेळाडूंचे शालेय समितीचे चेअरमन ॲड. किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती संगिता जोशी, पर्यवेक्षक सुनिल कानडे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# आठवड्याच्या पहिल्या दिवशी शेअर बाजाराची सकारात्मक सुरुवात

मुंबई : मजबूत जागतिक संकेतांवर स्वार होऊन भारतीय शेअर बाजाराने सोमवारी (दि.२१)आठवड्याच्या पहिल्या व्यापार दिवशी, सकारात्मक सुरुवात केली आहे. बीएसई सेन्सेक्सने मागील बंद ८१२२४.७५ वरून ५०० पेक्षा अधिक अंकांची झेप घेऊन प्री-ओपनमध्ये ८१७७०.०२ वर सुरुवात केली तर एनएसई निफ्टीने मागील बंद २४८५४.०५ वरून २४९५६.१५ वर ओपनिंग केली. यापूर्वी शुक्रवारीही बाजाराने घसरणीचा कल मोडून काढत हिरव्यात रंगात व्यवहार केला होता.

चांगल्या जागतिक संकेतांच्या दरम्यान सोमवारी, देशांतर्गत शेअर बाजारात चांगली खरेदी दिसून येत असून सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांक मजबूत झाले आहेत. सुरुवातीला निफ्टीने वाढीसह २४,९५० चा टप्पा पार केला तर सेन्सेक्समध्ये ४०० हून अधिक अंकांची वाढ दिसून आली. यादरम्यान, निफ्टीवर बँक, फायनान्शिअल, आयटी, ऑटो, फार्मा, मेटल आणि रियल्टी निर्देशांक हिरव्या रंगात तर एफएमसीजी निर्देशांक लाल रंगात व्यवहार करत आहे.

# वाहनांच्या वाढत्या प्रदुषणाला इलेक्ट्रिक वाहने सर्वोत्तम पर्याय



जीत मोटर्स चेतक शोरुमला माजी आमदार अरुण जगताप यांनी भेट देऊन बजाजच्या इलेक्ट्रिक स्कूटरची माहिती घेतली.

### अरुण जगताप यांचे प्रतिपादन; जीत मोटर्स चेतक शोरुमला भेट

नगर - वाहनांच्या वाढत्या प्रदुषणाला इलेक्ट्रिक वाहने सर्वोत्तम पर्याय आहे. दिवसंदिवस वाहनांच्या संख्येत वाढ होत असून, इंधनाचे दर देखील गगनाला भिडत आहे. सर्वसामान्यांना कामानिमित्त ई स्कुटर परवडणारी असल्याची भावना अरुण जगताप यांनी व्यक्त केली.

शहरातील नगर-पुणे महामार्ग सक्कर चौक येथे नव्याने झालेल्या जीत मोटर्स चेतक शोरुमला माजी आमदार अरुण जगताप यांनी भेट देऊन बजाजच्या इलेक्ट्रिक स्कूटरची माहिती घेतली.

शोरुमच्या वतीने जगताप यांचे स्वागत करुन सत्कार करण्यात आला. यावेळी जनक आहुजा, भावना नय्यर, अवयान नय्यर, अभिमन्यू नय्यर, शोरूमचे व्यवस्थापक रमीज शेख आदी उपस्थित होते.

अभिमन्यू नय्यर यांनी पेट्रोल, डिजेलला पर्याय व प्रदुषणमुक्त शहरासाठी बाजारपेठेत अद्यावत सोयी-सुविधांसह बजाजच्या चेतक प्रिमियम आणि चेतक अर्बन या ई स्कुटरला वाढत्या मागणीची व यामध्ये असलेल्या सोयी-सुविधांची माहिती दिली.

